## ➤ महत्त्वाचे

### सिगारेटच्या वादातून हत्या; बाप-लेकास पोलीस कोठडी

**सिडको ।** सिगारेट जादा किमतीत का विकतो, या कारणावरून झालेल्या वादातून टपरी चालकाने काठीच्या प्रहाराने ग्राहकाचा खून केल्याची घटना राजे संभाजी स्टेडियम मागील परिसरात घडली. या प्रकरणी टपरी चालक आणि त्याच्या मुलाला पोलिसांनी अटक केली असून सात एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. घटनास्थळी मिळालेल्या माहितीनुसार, मृत व्यक्ती मद्यधुंद अवस्थेत टपरीवर आला आणि सिगारेटच्या किमतीवरून वाद घालू लागला. त्याने टपरीतील साहित्याची नासधूस केल्याने संतप्त झालेल्या टपरी चालकाने काठीने जोरदार मारहाण केली, ज्यामुळे ग्राहक गंभीर जखमी झाला. त्याला रुग्णालयात नेले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी घटनास्थळावरून गुन्ह्यात वापरलेली काठी जप्त केली असून आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता सात एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ माजली असून पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

### भरवस येथे भागवतकथा कार्यक्रमाचे ध्वजारोहण

**विंचूर ।** भरवस, ता. निफाड येथील द्वारकाधिश सेवा संस्था ट्रस्ट, श्रीकृष्ण मंदिरचे संचालक, सर्वेसर्वा पूजनीय प.पू.प.महंत श्री मयंकराज बाबा पंजाबी (अध्यक्ष महानुभाव परिषद, नाशिक) यांनी सुप्रसिद्ध आदरणीय प.पू.प.महंत चिरडे बाबा यांच्या सुमधुर वाणीमधून "संगीतमय भागवत कथा" या कार्यक्रमाचे दि.७ ते दि.१३ एप्रिल असे एकूण सात दिवस सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत "संगीतमय भागवत कथा" कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. "साडे तीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त" असलेल्या "गुडीपाडवा" या नवीन वर्षाच्या शुभमुहूर्तावर "ध्वजपूजन आणि ध्वज उभारणे" हा उद्घाटन कार्यक्रम आयोजित केलेला होता. त्यानिमित्त या कार्यक्रमाची रुपरेषा आणि सूत्रसंचालन समाधान पाटील (ग्रामपंचायत अधिकारी) ग्रुप ग्रा.पं.भरवस (मानोरी खु)हे करणार आहे. या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थिती लासलगाव पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलिस निरीक्षक भास्कर शिंदे, प.पू.प.महंत प्रेममुनी बाबा, चेतन बाबा, लोकनेते सहकारी बँक लासलगावचे सर्वेसर्वा नानासाहेब पाटील, भरवस गावचे पो.पाटील विलास चौधरी, ग्रा.पं.उपसरपंच संपत जाधव, ग्रा.पं.सदस्य धर्मराज जाधव, पांडुरंग जाधव, पाचोरे गावचे भूमिपुत्र तानाजीराव आंधळे, विजय वावधाने, किशोर गीते, बंडू पठाडे, पवार तसेच आजूबाजूच्या गावातून या कार्यक्रमासाठी हजर असलेले उपदेशी, अनुयायी व इतर जेष्ठ-श्रेष्ठ मंडळी आदी उपस्थित होते.

### मूल होत नसल्याने विवाहितेचा छळ;

**नाशिक ।** मूल होत नसल्याच्या कारणावरून पती, सासू व दीर हे संगनमताने शारीरिक व मानसिक छळ करीत होते. हा सासरचा छळ असह्य झाल्याने महिलेने गळफास घेत आत्महत्त्या केल्याची घटना घडली. पोलिसांच्या माहितीनुसार व पुष्पा संजय परदेशी (४८, रा. सातारा खंडोबा, जि. छत्रपती संभाजीनगर) यांच्या फिर्यादीनुसार, विवाहितेने सोमवारी (दि.३१) राहत्या घरी गळफास घेत आत्महत्त्या केली. परदेशी यांची मुलगी कोमल हिचा २०१९ मध्ये संशयित सचिन मुंडावरे याच्याशी विवाह झाला होता. २०१९ ते २०२५ या दरम्यान तिला मूल होत नसल्याच्या कारणावरून तिचा शारीरिक व मानसिक छळ केला जात होता. त्यास कंटाळून तिने आत्महत्या केल्याची तक्रार असून, सचिन मोहन मुंडावरे, मनीषा मोहन मुंडावरे, कल्पेश मोहन मुंडावरे (सर्व रा. एकदंतनगर, उत्तमनगर, सिडको) यांनी तिला प्रवृत्त केल्याचे तक्रातीत म्हटले आहे. कोमल सचिन मुंडावरे (२५) असे मृत विवाहितेचे नाव आहे. तक्रारीनुसार त्यानुसार अंबड पोलिसात संशयितांविरोधात आत्महत्त्येस प्रवृत्त केल्या-प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास महिला उपनिरीक्षक उंडे या तपास करीत आहेत.


### महिलेची आत्महत्येची घटना; उपचारादरम्यान मृत्यू

**सिडको ।** अंबड येथे राहणाऱ्या एका महिलेने स्वतःला जाळून घेतल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. वर्षाबाई गोकुळ पाटील (४१), रा. माऊली लॉन्स यांनी दि. ११ मार्च २०२५ रोजी अंबड येथील आपल्या राहत्या घरी स्वतःला पेटवून घेतले. या घटनेत त्या गंभीररित्या भाजल्या गेल्या होत्या. प्राथमिक उपचारासाठी त्यांना तातडीने नाशिकच्या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना चाळीसगावच्या देवरे हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. मात्र प्रकृती अधिकच बिघडल्याने त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णालयात उपचार सुरू असतानाच दि. १९ मार्च २०२५ रोजी संध्याकाळी ६:३० वाजता त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद बेगमपुरा पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. पुढील तपास व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार अंबड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी तपास सुरू केला असून अधिक माहिती पुढे येण्याची शक्यता आहे.

# निकृष्ट दर्जाच्या रस्त्याच्या कामामुळे नागरिकांमध्ये संताप; तपासणीची मागणी

## थातूरमातूर पद्धतीने सुरू असलेले हेच ते वीस कोटींचे सिमेंट काँक्रीटीकरण रस्त्याचे काम







**सिडको ।** आयटीआय पुल ते वावरे नगरदरम्यान सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम सुरू असले तरी त्याच्या दर्जाबाबत मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत. अत्यंत हलक्या प्रतीच्या साहित्याचा वापर, अपूर्ण तांत्रिक प्रक्रिया आणि गुणवत्तेची तपासणी न केल्याने या रस्त्याचे आयुष्य अल्प ठरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामुळे संतप्त नागरिकांनी थर्ड पार्टी ऑडिट आणि तपासणीची मागणी केली आहे.

रस्त्याच्या बांधकामात सुरुवातीचे ग्रेड एक व ग्रेड दोनचे काम झाले असले, तरी आवश्यक असलेला डब्ल्यू एम एन टप्पा केला गेलेला नाही. हे मजबूत तळ रस्ता तयार करण्यासाठी महत्त्वाचे असते, मात्र ठेकेदाराने हा टप्पा वगळल्याचे समोर येत आहे. मोठ्या रोड रोलरऐवजी लहान रोड रोलरचा वापर करून खडी दाबण्यात आल्याने रस्त्याला आवश्यक मजबुती मिळालेली नाही.

या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. मात्र, प्रशासनाने हेवी स्टीलचा वापर न करता कमी दर्जाचे साहित्य वापरले आहे. त्यामुळे काही महिन्यांतच हा रस्ता खराब होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. स्थानिक नागरिकांनी आणि तज्ज्ञांनी हे दर्जाहीन काम उघडकीस आणत तत्काळ कारवाईची मागणी केली आहे.

या रस्त्याचे काम दोन वर्षांच्या कालावधीत पूर्ण होण्याचे नियोजन होते. मात्र, निर्धारित वेळेच्या आधीच काम आटोपण्याची घाई ठेकेदार व प्रशासन करत आहे. यामुळे आवश्यक गुणवत्ता नियंत्रणाच्या प्रक्रियांकडे दुर्लक्ष होत आहे. प्रॉपर सोलिंग, मजबुतीकरण आणि अंतिम टप्प्यातील फिनिशिंगच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी आढळून आल्या आहेत. कामगारांकडून नियोजनबद्ध पद्धतीने काम करून घेण्याऐवजी वेळ वाचवण्यासाठी अर्धवट आणि नियमबाह्य पद्धतीने रस्ता तयार केला जात आहे. नागरिकांच्या मते, ही घाई एका मोठ्या गैरव्यवहाराचा भाग असू शकते. निकृष्ट दर्जाच्या या कामामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून त्यांनी नगरविकास विभाग, महापालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रारी केल्या आहेत. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, तसेच या रस्त्याचे थर्ड पार्टी इन्स्पेक्शन तातडीने करण्यात यावे, अशी मागणी होत आहे.

जर त्वरित उपाययोजना केल्या नाहीत, तर नागरिक आंदोलन करण्यास मागे हटणार नाहीत, असा इशारा देण्यात आला आहे. प्रशासन आणि संबंधित ठेकेदारांनी याची गंभीर दखल घेतली नाही, तर या निकृष्ट कामाची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

> कोट्यावधी रुपये खर्च करून हा रस्ता होणार आहे. मात्र या रस्त्याला कुठल्याही प्रकारची गुणवत्ता नाही. निकृष्ट दर्जाचे काम सुरू आहे. महापालिका आयुक्तांनी संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकले पाहिजे. ठेकेदारावर कारवाई करणे आवश्यक आहे.
> – सुमित शर्मा, सामाजिक कार्यकर्तें

# कांदा पिकात सिलिकॉन ठरतेय वरदान

(राम सुरसे यांजकडून)

**वावी ।** सध्याच्या वातावरणात खूप बदल होत आहे. कधी खूप उन्हाचा तडाखा तर खूपच कमी प्रमाणात थंडी, यामुळे कांदा पिकाला पाहिजे असलेले पोषक वातावरण तयार होत नाही. आणि त्यात म्हणजे तणनाशकांचा अतिरेक वापर याचा परिणाम पिकाच्या वाढीवर होत असतो.पिकांवर अनैसर्गिक ताण येतो त्यामुळे पिकाची वाढ खुंटली जाते. म्हणून अशात सिलीकॉनचा वापर केला जातो.

सिलीकॉन हा एक दुय्यम अन्नघटक आहे. फार महत्त्वाचा अन्नघटक असून सध्या त्याच्याकडे दुर्लक्ष होत आहे, म्हणजे दुर्लक्षित आहे. दुय्यम घटकांमध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम, गंधक (Sulfur) चौथा घटक म्हणजे सिलीकॉन होय,हा घटक दोन्ही प्रकारांत म्हणजे फवारणी आणि जमिनीतून देता येतो.आपण इतर अन्नघटक देत असतो,परंतू सिलीकॉन हा घटक सहजासहजी देत नाही.त्यामुळे आपण भरपुर फायद्यांना मुकतो,जसे की सिलिकॉन हे एक पिकावर येणारा ताण (ट्रेस)कमी करणारा एजंट आहे.

पिकावर बऱ्याच कारणांमुळे ताण येतो, जसे की वातावरणातील बदल, हवामान बदल, पाण्याची कमी,तणनाशकांची फवारणी, कीड, रोग, मावा, तसेच फवारणीतून औषधांचे प्रमाण कमी जास्त झाले तरीही कांद्यावर ताण येतो आणि हा ताण आला की पिकांची वाढ खुंटते, पाने खुजी होतात. पाने गोळा होतात. झाडे स्तब्ध होऊन जातात. यांच्याकरिता आपण योग्य प्रमाणात सिलीकॉन वापरले तर पिकावर येणारा ताण कमी होतो. पिकांची वाढ चांगली होऊ शकते.

सिलीकॉनचा दुसरा आणि मुख्य फायदा म्हणजे पाण्याची बचत होते,पानांद्वारे बाष्पीभवन होत असते. तेव्हा आपण पिकाला कांद्याला सिलीकॉन फवारले अथवा जमिनीतून पाण्याव्दारे दिले तर होणारे बाष्पीभवन कमी होईल, मुळावर बारीक थर तयार होऊन उन्हापासून संरक्षण होईल आणि कांदा पोसायला मदत होईल.

तसेच सिलीकॉन वापरल्याने कांद्याच्या पानांची रुंदी वाढते पानांची जाडी वाढते,पान रफ होते असे आपण म्हणतो,त्याने करपा सारखे रोग येणार नाही, तसेच पान रफ झाल्याने फुलकीडे, रसशोषक किडे कांद्याच्या पाथीवर नुकसान करणार नाही.नुकसानीला अटकाव होतो.



> सिलीकॉनचा वापर करताना सुरुवातीला लागवडीच्या वेळी जमिनीमध्ये दाणेदार (गोळीचा आकार) स्वरूपात असते ४०-५०kg एकरी याप्रमाणे इतर खतांमध्ये मिसळून टाकावे. नंतर कांद्याची मुळे जसजशी मोठी होतील तसतसे सिलीकॉन कांद्याला लागु होईल. फवारणी करतांना २५ ते ३० दिवसांनी एकदा ४५-५० दिवस आणि 80 ते 90 दिवसानी फवारणी करावी, तसेच कांद्याला ठिबक सिंचन असेल तर ठिबक मधून पाण्यातून ३०-४०दिवसांनी सोडावे तसेच ८० ते ९० दिवसांनी एकदा सोडावे असे केल्याने कांद्याची गुणवत्ता सुधारते, परिणामी उत्पादन वाढते, आणि साठवण केल्यावर चाळीतील कांद्याचे आयुष्य वाढते. त्यामुळे सिलीकॉनचा वापर हा प्रत्येक पिकांमध्ये योग्य वेळी केला गेला पाहिजे.
> – **सुनील त्र्यंबक भिसे,** बी.एस्सी., ॲग्री, महाराष्ट्र शासन शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकरी, मोह, (सिन्नर)

# आंतरविद्यापीठ कर्मचारी क्रिकेट स्पर्धेसाठी मुक्त विद्यापीठाचा संघ रवाना



**नाशिक ।** महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी – २० क्रिकेट २०२५ स्पर्धेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा संघ सहभागी होत आहे. त्यासाठी हा संघ रवाना झाला.

दि. ३ ते ०८ एप्रिल दरम्यान नागपूर येथील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ येथे ही स्पर्धा होत आहे. त्यासाठी विद्यापीठाचे मा. कुलगुरू संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाचा १६ सदस्यीय संघ स्पर्धेसाठी रवाना झाला. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्राचे प्रमुख डॉ. दयाराम पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. कुठलाही मैदानी खेळ हा मनुष्यास शारीरिक तंदुरुस्ती सोबत उत्साही व चैतन्यदायी ठेवत असतो. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यापीठ कर्मचारी यांनी या स्पर्धेत आपला सर्वोत्कृष्ट खेळ प्रदर्शित करावा आणि खेळाचा आनंद देखील लुटावा, असे आवाहन कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी याप्रसंगी केले.

सदर स्पर्धेसाठी विद्यापीठ क्रिकेट संघ कर्णधार म्हणून श्री. मिलिंद ठाकरे (आस्थापना कक्ष) तर उपकर्णधार म्हणून रामदास गुंबाडे (वित्त विभाग) यांची निवड करण्यात आली आहे. उर्वरित संघात लक्ष्मण शेंडे (परीक्षा विभाग), योगेश जाधव, देविदास जाधव व विजय शार्दूल (ग्रंथनिमिती केंद्र), निखिल शिंदे, संदीप भागवत व विनोद भडके (कृषि विज्ञान केंद्र), निवृत्ती अहिरे (सेवा सुविधा कक्ष), राजू खरपडे व अभिषेक देशमुख (बांधकाम व देखभाल कक्ष), दिगंबर गाडे (आरोग्य विज्ञान विद्याशाखा), दीपक जाधव (कृषि विज्ञान विद्याशाखा), संघ व्यवस्थापक- मंगेश पवार व प्रशिक्षक– सिध्दांत टाक (विद्यार्थी कल्याण बहि:शाल केंद्र) यांचा समावेश आहे.

# मविप्रच्या शाळांमध्ये ‘फिरती विज्ञान प्रयोगशाळा’

## मविप्र माजी विद्यार्थी संघटनेचा उपक्रम : २० हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार




**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज माजी विद्यार्थी संघटनेच्या प्रयत्नांतून आणि नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई यांच्या सहकार्याने ‘फिरती विज्ञान प्रयोगशाळा’ (बस) नाशिकमध्ये दाखल झाली आहे.

गुरुवारी (दि.३) गंगापूर रोडवरील होरायझन अकॅडमी (आयसीएसई) येथे मविप्र संस्थेचे संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी शाळेच्या प्राचार्या डॉ. निधी मिश्रा, विज्ञान शिक्षिका रेश्मा आळते आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. ही फिरती विज्ञान प्रयोगशाळा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या जिल्हाभरातील १५ शाळांना भेट देणार आहे. सुमारे २ हजार किलोमीटरचा प्रवास करून २० हजार विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञान प्रदर्शन पोहोचवण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. या प्रयोगशाळेत इयत्ता ८ वी ते १० वीच्या विज्ञान अभ्यासक्रमावर आधारित गती, गुरुत्वाकर्षण, विद्युत, चालकता, जागतिक दिनदर्शिका आणि इतर अनेक विषयांवर २४ सहभागी प्रदर्शने आहेत.

### अशी आहे ‘फिरती विज्ञान प्रयोगशाळा

एका बसमध्ये ‘फिरती विज्ञान प्रयोगशाळा’ तयार करण्यात आली असून, यामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विविध विषयांवर आधारित २४ सहभागी प्रदर्शने आहेत. ग्रामीण भागात विज्ञान पोहोचवण्याचा ‘एनसीएसएम’चा प्रयत्न आहे. ज्या विद्यार्थ्यांना विज्ञान केंद्रांना भेट देणे शक्य नाही, त्यांच्यासाठी ही ‘फिरती प्रयोगशाळा’ उपयुक्त असून, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगांद्वारे विज्ञान शिकण्याची संधी मिळणार आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानातील आवड वाढविण्यासाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास मविप्र माजी विद्यार्थी संघटनेने व्यक्त केला आहे. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शाळांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ५ व ६ एप्रिलला नाशिककरांना संधी

येत्या ५ आणि ६ एप्रिलला ही ‘फिरती विज्ञान प्रयोगशाळा’ पाहण्याची संधी मविप्र माजी विद्यार्थी संघटनेने नाशिकरांसाठी उपलब्ध करून दिली आहे. शनिवारी आणि रविवारी ही बस, मविप्र संस्थेच्या गंगापूर रोडवरील उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालयाच्या प्रागंणात असणार आहे.

## महत्त्वाचे

### न्यू मराठा हायस्कूलमध्ये डॉ. पवार यांना अभिवादन

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू मराठा हायस्कूलमध्ये कर्मवीर डॉ. वसंतराव पवार यांची जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक ज्ञानेश्वर शिंदे होते. व्यासपीठावर जेष्ठ शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजनाने करण्यात आली. व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर डॉ.वसंतराव पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अनुजा तिडके, तेजल उंबरकर यांनी मनोगत व्यक्त केले. ऋतिका पाटील, देवेश्री चौधरी यांनी सूत्रसंचालन केले. रुपाली शेडगे यांनी फलक लेखन केले. वैष्णवी गोरे हिने आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक बंधू व भगिनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### गायकवाड यांना समाजरत्न पुरस्कार

**देवळाली कॅम्प ।** शहरातील सामाजिक कार्यात मोलाचे योगदान देणारे रवींद्र गायकवाड यांना समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार त्यांच्या समाजहितासाठी केलेल्या



उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन देण्यात आला आहे. देवळाली कॅम्प, शिंगवे बहुला या भागातील तरुणांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविणारे गायकवाड यांनी शिक्षण, आरोग्य आणि गरजूंसाठी मदत या सारख्या क्षेत्रांत मोठे कार्य केले आहे. त्यांच्या या योगदानाची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार देण्यात आला. विविध सामाजिक उपक्रमांतून समाजातील वंचित घटकांना मदतीचा हात देणाऱ्या गायकवाड यांचे कार्य प्रशंसनीय असल्याचे मत या वेळी व्यक्त करण्यात आले. पुरस्कार मिळाल्याने गायकवाड यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, हा पुरस्कार माझ्या कार्याला मिळालेली पोचपावती असून, यामुळे समाजासाठी अधिक उत्साहाने कार्य करण्याची प्रेरणा मिळेल. या सोहळ्याला अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक नागरिक आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मविप्र वास्तुकला महाविद्यालयाचा डंका!

**नाशिक ।** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे आयोजित 'स्टार्टअप ऑलिम्पियाड २०२५' स्पर्धेत राज्यभरातून आलेल्या ४०० प्रवेशिकांपैकी मविप्र संचलित आर्किटेक्चर महाविद्यालयाने सादर केलेल्या 'ओनियन स्टोरेज सिस्टिम' या मॉडेलची अंतिम सहा संघांमध्ये निवड झाली आहे. विद्यापीठातर्फे महाविद्यालयाला पारितोषिकाचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्यूबेशन व एंटरप्राइज यांच्यातर्फे महाविद्यालय स्तरावर 'स्टार्टअप ऑलिम्पियाड २०२५' ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी राज्यभरातून ४०० पेक्षा जास्त संघांनी सहभाग घेत नावीन्यपूर्ण मॉडेल्स सादर केले होते. यापैकी निवडक २६ संघांच्या मॉडेल्सची निवड करण्यात आली. या २६ संघांनी तज्ज्ञांसमोर आपल्या मॉडेल्सबद्दल प्रत्यक्ष सादरीकरण केले. त्यातून मविप्र आर्किटेक्चर महाविद्यालयाच्या प्रॉडक्ट ॲण्ड डिझाइन या विभागातील पाच विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'ओनियन स्टोरेज सिस्टिम' अर्थात, कांदा साठवणूकसंदर्भातील उपकरणाची अंतिम सहामध्ये निवड करण्यात आली. शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत नाविन्यपूर्ण आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारे असे हे उपकरण कांदा साठवणुकीसाठी फायदेशीर ठरू शकते, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### मनावर नियंत्रण ठेवल्यास शारीरिक आजार नियंत्रित : डॉ. आशर शेख

**नाशिक ।** मनुष्याच्या विचारांनुसार त्यांना आजार होतात व ते बरेही होतात. प्रत्येक आजारामागे मन असते. मन बदलले, विचार बदलले की त्याचा शरीरावर परिणाम होतो. सर्व आजार मानसिक विकारांशी संबंधित आहेत. मनावर नियंत्रण ठेवल्यास शारीरिक आजार नियंत्रित राहतात, असे प्रतिपादन केटीएचएमचे माजी विद्यार्थी, प्रमुख व्याख्याते आणि प्रसिद्ध होमिओपॅथीतज्ज्ञ डॉ. आशर शेख यांनी केले. केटीएचएम महाविद्यालयात आयोजित 'होमिओपॅथी उपचार व महत्व' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य तथा सेवक संचालक डॉ. एस. के. शिंदे यांनी डॉ. आशर शेख यांचा परिचय करून दिला. यावेळी विज्ञान विभागप्रमुख किरण रेडगावकर, कला विभागप्रमुख रामनाथ पवार, वाणिज्य विभागप्रमुख दिलीप गावले, एन. बी. कुयटे उपस्थित होते. डॉ. आशर शेख म्हणाले, प्रत्येक आजाराचा परिणाम मेंदू, मान व शरीरावर होतो. ताणतणावांचा विचारांवर परिणाम दिसून येतो. आपल्या विचारांनी आपले आजार बरे होतात. दररोज सकाळी थंड पाण्याने आंघोळ करा. व्यायाम, अनवाणी चालण्याने अनेक आजार बरे होतात. आजार का होतात आणि बरे कसे होतात, याची उदाहरणे त्यांनी दिली.

---

### पुणे विद्यापीठ नाशिक उपकेंद्र आणि नासिक पोलीस आयुक्तालयाच्या संयुक्त विद्यमाने

# कुंभमेळा नियोजनाबाबत बैठक

## वर्क फोर्सचा कुंभमेळ्याच्या नियोजनामध्ये उपयोग करणे

**नाशिकमधील 200 पेक्षा जास्त महाविद्यालये व दोन लाखापेक्षा जास्त विद्यार्थी तसेच एनएसएस, राष्ट्रीय छात्रसेना व विद्यार्थी कल्याण मंडळाचे स्वयंसेवकांना सहभागी करून घेणे.**





**नाशिक ।** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नाशिक उपकेंद्र आणि नासिक पोलीस आयुक्तालय यांच्या संयुक्त विद्यमाने मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या आय. एम. आर. टी. या व्यवस्थापन महाविद्यालयांमध्ये कुंभमेळा २०२७ विषयक नियोजनाबाबत सभा संपन्न झाली.

या सभेमध्ये नासिक शहर व परिसरातील तसेच तालुक्यातील महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यार्थी कल्याण अधिकारी, एन एस एस व एन सी सी समन्वयक यांची सभा संपन्न झाली. या सभेला पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी संबोधित केले. पुणे विद्यापीठातर्फे प्र. कुलगुरु डॉ. पराग काळकर यांनी पुणे विद्यापीठाची भूमिका मांडली. तसेच एम व्ही पी संस्थेचे सरचिटणीस नितीन ठाकरे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य सागर वैद्य यांनी मार्गदर्शन केले. या सभेचा मुख्य हेतू म्हणजे नासिक मध्ये २०२७ मध्ये होऊ घातलेला कुंभमेळा याच्या नियोजनामध्ये नासिक मधील २०० पेक्षा जास्त महाविद्यालये व दोन लाखापेक्षा जास्त विद्यार्थी तसेच एनएसएस, राष्ट्रीय छात्रसेना व विद्यार्थी कल्याण मंडळाचे स्वयंसेवक यांना सहभागी करून घेणे हा होता. जी संख्या १५००० पेक्षा जास्त आहे. या वर्क फोर्सचा कुंभमेळ्याच्या नियोजनामध्ये उपयोग करणे, त्यामध्ये माहिती व तंत्रज्ञान याचा उपयोग करणे, वाहतूक व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, क्राउड कंट्रोल, सुरक्षा, कचरा व्यवस्थापन, बंदोबस्त याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रास्ताविक पर मनोगतात पोलीस विभागाच्या महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यार्थ्यांकडून अपेक्षा पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी मांडल्या. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. प्रशांत सूर्यवंशी यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. विलास देशमुख यांनी केले आणि आभार उपकेंद्राचे उपकुलसचिव श्रीपाद बुरकुले यांनी मानले. यावेळी पोलीस उपायुक्त खांडवी, प्रशांत बच्छाव, सहाय्यक आयुक्त नितीन जाधव उपस्थित होते.



---

## आंबेडकर जयंतीच्या आयोजनावरून निर्माण झालेला वाद पोलिसांच्या मध्यस्थीने मिटला



**सिडको ।** सिडको परिसरातील पवन नगर मैदानावर होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या आयोजनावरून दोन गटांमध्ये निर्माण झालेला वाद अखेर पोलिसांच्या मध्यस्थीने शांततेत मिटवण्यात आला. या निमित्ताने दोन्ही गटांनी संयम राखत एकमेकांना सहकार्य करण्याचे आश्वासन दिल्याने येणारी आंबेडकर जयंती शांततेत आणि उत्साहात साजरी होणार आहे. त्यामुळे परिसरात सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती-निमित्त पवन नगर मैदानावर मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. यंदाच्या वर्षी कार्यक्रमाच्या नियोजनावरून दोन गटांमध्ये मतभेद झाले. नियोजनातील प्रमुख भूमिका यावरून या दोन गटांमध्ये वाद निर्माण झाला होता. काही वेळेस हा वाद चांगलाच तीव्र होऊन तो संघर्षाच्या दिशेने जात असल्याचे चित्र होते. गुरुवारी दुपारी अंबड पोलीस ठाण्यात दोन्ही गटांचे प्रमुख व समर्थक मोठ्या संख्येने एकत्र जमले होते. वादाची तीव्रता लक्षात घेता पोलिस प्रशासनाने तत्काळ हस्तक्षेप केला. पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, पोलीस आयुक्त शेखर देशमुख व वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांनी या वादात मध्यस्थी करत दोन्ही गटांशी संवाद साधला. सायंकाळी पुन्हा एकदा दोन्ही गट आमनेसामने आले असताना पोलिसांनी संयम आणि प्रसंगावधान राखून शांततेची भूमिका बजावत दोन्ही गटांना समजूतदारपणे समवेत आणले.

या बैठकीत गटांचे प्रमुख संतोष सोनपसारे व मुकेश शहाणे यांनी शांततेने आणि सहकार्याने कार्यक्रम पार पाडण्याचे आश्वासन दिले. आमच्यातील वाद मिटले असून, यंदाची आंबेडकर जयंती अधिक मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार आहे," असे मुकेश शहाणे यांनी यावेळी सांगितले. तर संतोष सोनपसारे यांनी देखील, आपण सर्वजण बाबासाहेबांच्या विचारांचे अनुयायी आहोत. त्यांचा संदेश म्हणजे बंधुता, समता आणि न्याय. त्यामुळे वाद न ठेवता आम्ही एकत्र येऊन कार्यक्रम साजरा करू असे स्पष्ट केले. पोलिस प्रशासनाच्या सकारात्मक हस्तक्षेपामुळे दोन्ही गटांमध्ये निर्माण झालेला वाद सामोपचाराने मिटवण्यात आला. त्यामुळे सिडको परिसरात शांततेचे वातावरण कायम राखण्यास मदत झाली आहे. नागरिकांनी दोन्ही गटांचे आणि पोलिस प्रशासनाचे अभिनंदन केले आहे. या घटनेतून सामाजिक सौहार्द व सामंजस्याचे उत्तम उदाहरण सिडको परिसराने दिले आहे. आंबेडकर जयंतीसारखा महत्वाचा दिन शांततेत साजरा करण्याचा घेतलेला निर्णय निश्चितच अनुकरणीय आहे. यामुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचला असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची खरी शिकवण या निमित्ताने पुढे आली आहे. मुकेश शहाणे, संतोष सोनपसारे, संजय साबळे, सुनील जगताप, विनोद भडांगे, गौरव केदारे, विनोद मगर, संजय गांगुर्डे, अनिल आठवले आदी उपस्थित होते.

## लॅक्रॉस खेळाची १० एप्रिलला जिल्हा निवड चाचणी






**नाशिक ।** जागतिक ऑलिंपिक संघटनेने लॅक्रॉस या खेळाचा समावेश २०२८ मध्ये लॉस एंजलिस, कॅलिफोर्निया युनायटेड स्टेट्स येथे होणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धेत केला आहे. यामुळे हा खेळ खेळण्यासाठी अनेक खेळाडू इच्छुक झाले आहेत. या खेळाडुंना या खेळाची सखोल माहिती मिळावी यासाठी नाशिक येथे गेल्या पाच - सहा महिन्यांपासून प्रयत्न केले जात आहेत.

या खेळामध्ये जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे, खेळाडूना योग्य संधी मिळावी यासाठी लॅक्रॉस असोसिएशन ऑफ नाशिक या संघटनेमार्फत १० एप्रिल २०२५ रोजी स्व. मीनाताई ठाकरे, विभागीय क्रीडा संकुल, हिरावाडी, नाशिक येथे सबज्युनिअर, ज्युनिअर आणि सीनियर गटाच्या मुला / मुलींची नाशिक जिल्हा संघासाठी निवड चाचणीचे आयोजन केले आहे. सब ज्युनियर गटासाठी खेळाडूंची जन्म तारीख ३० एप्रिल, २००८, ज्युनियर गटासाठी ३० एप्रिल, २००६ किंवा त्यानंतरची असावी.

या निवड चाचणीतून निवड झालेले खेळाडू पुणे येथे १४ आणि १५ एप्रिल २०२५ दरम्यान आयोजित महाराष्ट्र राज्य लॅक्रॉस अजिंक्यपद स्पर्धेत नाशिक जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील. मागील वर्षी डिसेंबर,२०२४ मध्ये सेलू , परभणी येथे झालेल्या राज्य स्पर्धेमध्ये नाशिक जिल्ह्याच्या वरिष्ठ गट पुरुषाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला होता. त्याबद्दल नाशिक पूर्वचे आमदार ॲड. राहुल ढिकले यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले होते. यावेळी देखील नाशिक जिल्ह्याचे वर्चस्व कायम राहावे याकरिता खेळाडूंना प्रोत्साहन देण्यात येत आहे, त्यांना सराव करण्यासाठी मैदान आणि इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहे. संघटनेने नुकतेच या खेळाचे साहित्य खरेदी केले असून खेळाडूंना ते मोफत वापरण्यात दिले जात आहे. या निवड चाचणीत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा संघटनेचे मार्गदर्शक शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त अशोक दुधारे, संघटनेचे अध्यक्ष शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आनंद खरे, सरचिटणीस दीपक निकम-पाटील, खजिनदार ज्योती निकम, यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी अविनाश वाघ मो. क्र. ७०३०७९६९७६, शैलेश रकीबे ७३९७९७७१७३, शशी भूषणसिंग मो. ८६००२००५५२ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन संघटनेमार्फत करण्यात आले आहे.

---

# सातपूरच्या ईएसआय रूग्णालयांमध्ये सामान्यांनाही मिळणार महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ

## सात एप्रिलपासून शुभारंभ । आमदार सीमा हिरे यांची माहिती

**सातपूर ।** सिडको, अंबड, सातपूर भागात मोठया संख्येने मध्यम आर्थिक स्थिती असलेल्या रहिवाशी असून येथील नागरिकांना ईएसआय रुग्णालयातही महात्मा फुले जनआरोग्य योजनांचा लाभ मिळावा यासाठी आमदार सिमा हिरे याच्या प्रयत्नांना यश आले आहे.सातपूरसह राज्यातील ईएसआयच्या बारा रूग्णालयांमध्ये सामान्यांना महात्मा फुले जनआरोग्य योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून येत्या सात एप्रिलपासून सातपूर येथील रुग्णालयात योजनेचा शुभारंभ होणार असल्याची माहिती आ.हिरे यांनी दिली आहे.शासनाच्या या निर्णयामुळे रूग्णालयाचा दर्जा सुधारणार असून अत्याधुनिक सोयी-सुविधा,उपकरणे उपलब्ध होणार आहेत.

पश्चिम विधानसभा मतदार संघात मध्यम आर्थिक परिस्थिती असलेल्या रहिवाशांची संख्या लक्षणीय आहे. त्यांना उपचारासाठी इतरत्र जाणे शक्य नसल्याने येथील ईएसआय रूग्णालयातच महात्मा फुले जनआरोग्य योजनेची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आ.हिरेंनी शासनाकडे पाठपुरावा सुरू केला होता.याबरोबरच काही दिवसांपूर्वीच आ.हिरे यांनी विमा कामगार कॉर्पोरेशनचे अध्यक्ष अस्तिककुमार पांडे यांची भेट घेत साधनसामुग्रीच्या उपलब्धेते विषयी प्रस्ताव सादर केला होता.आमदार हिरेंचे मुद्दे पांडे यांना भावल्याने लवकरच अत्याधुनिक साधनसामुग्री उपलब्ध करून देत येत्या दोन, तीन महिन्यात आयसीयू आणि महिला प्रसूती कक्ष सुरू करण्यात येणार असल्याची ग्वाही पांडे यांनी दिली होती.



यातूनच आता सातपूर येथील ईएसआय रूग्यालयात लवकरच आयसीयू कक्ष आणि महिलांसाठी स्वतंत्र प्रसूतीगृह सुरू करण्याच्या सूचना महामंडळाने प्रशासनाला केल्या आहेत.या बरोबरच सातपूरसह राज्यातील उल्हासनगर, कांदिवली, मुलुंड, वाशी, वरळी, नागपूर, सोलापूर, पुणे, पिंपरी, चिंचवड,ठाणे येथील ईएसआयच्या रूग्णालयांमधून कामगारांसह सामान्यांनाही यापुढे महात्मा फुले जनआरोग्य योजनांच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. कामगारांसह सामान्यांना आरोग्य विषयक उत्तमोत्तम सुविधा मिळाव्यात यासाठी सातपूर ईएसआय रूग्णालयात लवकरच अत्याधुनिक साधनसामुग्री, उपकरणे उपलब्ध होणार असून महात्मा फुले जन आरोग्य योजनांचा लाभ आधिकाधिक नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आ. सीमाताई हिरे, मुख्य वैद्यकीय अधिक्षक डॉ. बी.एम.पावरा, निवासी वैद्यकीय अधिकारी म.अ.दांडगे, माजी वैद्यकीय अधिक्षक डॉ. सरोज जवादे, रूप्रिज पवार, स्मिता दहेकर, छाया चौधरी आदींनी यांनी केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ओढलेले ताशेरे ऐकून सर्वच मराठी माणसाच्या मनाला वेदना झाल्या आहेत. या सरकारच्या चुकीच्या पावलांमुळे महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली, असे म्हटल्यास अनुचित ठरणार नाही. पुरोगामी, सहिष्णू अशी ओळख असलेल्या आपल्या महाराष्ट्राला संपवायला निघालेल्या या सरकारचे सर्वोच्च न्यायालयानेच कानउघडणी केली ते बरेच झाले. अनेकजण ओरडून - ओरडून सांगत होते की, धर्मद्वेष अन् जातीद्वेषावर आपल्या राजकारणाच्या पोळ्या भाजू नका. तुमचा फायदा होईल, पण महाराष्ट्राचे नुकसान होईल. मात्र, सरकारने कानात बोळे घातले होते. सर्वोच्च न्यायालयानेच सरकारचे कान उघडले. सर्वोच्च न्यायालयाने सरकारची 'नपुंसक' अशी निर्भत्सना करताना धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या घटनांना सरकारला जबाबदार धरले आहे. राजकारण आणि धर्म वेगळं करण्याची वेळ आली आहेश्, असेही न्यायालयाने सरकारला सुनावले आहे. महाराष्ट्राला दंगलींची प्रयोगशाळा करू इच्छिणाऱ्यांना न्यायालयाने चांगलीच चपराक लगावली आहे. या सरकारमध्ये कोणी मर्द आहे का? याही पेक्षा स्पष्ट आणि योग्य पदवी महाराष्ट्र सरकारला सुप्रीम कोटार्ने दिली, ती म्हणजे नपुसंक. नपुंसक आणि नामर्द अर्थ एकच पण शब्द वेगळे. सरकारमध्ये असलेले सर्व नामर्द आहेत असे सुप्रीम कोर्टाचे म्हणणे आहे. या सरकारला कायदा सुव्यवस्था सांभाळता येत नाही. जाती धर्मात तेढ निर्माण करणे आणि त्याला खतपाणी देणे हेच सरकारचे काम सुरू आहे. निर्लज्ज, खोटारडे, कमिशनखोर, धार्मिक तेढ निर्माण करणारे आणि जनतेशी गद्दारी करणारे सरकार आहे. काय कारण असावे बरं सतत दुसऱ्या धर्माला नांवे ठेवण्याबद्दल.

या देशात हिंदु मुसलमान बांधव एकमेकांसाठी कुर्बान झाले आहेत. सुखदुःखात सामिल झाले आहेत. कोणत्याही प्रकारची दुर्भावना नसते. पण जातीयवादी राजकारणी मंडळींचे दुःख देखील लक्षात घ्या. पांच वर्षे राज्य चालवित असतांनाच त्यांना राजकारण खेळावं लागतेच. हिंदु मुस्लिमांच्या नात्यात दुही, संशय आणि दुष्मनीवरच राजकीय मंडळींचे भांडवल असते. दोन समाजात लावलेल्या आगीत आपली पोळी भाजून घेण्यात त्यांचा राजकीय स्वार्थ असतो. त्यामध्ये सध्याच्या राजकीय पक्षातील काही अर्धवटराव आणि अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेलेच अनेकजण आहेत. त्यांची बडबड म्हणजे माकडांच्या हातात कोलीत दिले आहे. मंत्रीमंडळातील नादान आणि उठवळ आमदारांच्या विरोधात कारवाई सोडाच. कान धरून जाब विचारायची देखील हिम्मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नाही. याचा अर्थ संशयाची सुई मुख्यमंत्र्यांकडे जात आहे. अशा वेडपट, अल्प बुध्दी, अडाणी नेत्यांच्या विषारी वक्तव्यामुळे जातीपातीत तेढ निर्माण होत आहे. अलिकडच्या काळात अनेक ठिकाणी दंगली झाल्या आहेत. पण मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यावर कारवाई केलेली नाही. हे दुर्दैव आहे. इतिहासाचा अभ्यास नाही. वाचून बोलण्याची दानत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बद्दल जुजबी माहितीच्या आधारे थोबाडातून घाण बाहेर काढतात. औरंगजेबाचा वाद अशाच प्रकारचा आहे. संघाच्या नेत्यांनी आणि राज ठाकरेंनी आसूड ओढल्यावर सगळे भानावर आले. तोपर्यंत आपली डोकी गहाण ठेवली होती. मुख्यमंत्र्यांनाच त्यावर खुलासा करतांना घाम फुटला. इतिहास साक्षीला आहे. देशात हिंदु मुस्लिम समाजातील एकोपा, विश्वास आणि निष्ठा अबाधित आहे. एकमेकांवर निस्सीम प्रेम आणि आस्था आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी मुसलमानांनी बलिदान दिले आहे. ह्या एकोप्यात बिबवा घालण्याचे पाप सत्तेतील काही जातीयवादी मंडळी करत आहेत. मूळ इतर अनेक विषयांवरून लक्ष विचलित करण्यासाठी फालतू विषयांवर रान पेटवून दोन समाजात वातावरण पेटते ठेवले जात आहे. त्यापासून सावध रहावे लागणार आहे.

# राजकारण आणि धर्म वेगळं करण्याची वेळ आली आहे?








जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

महाराष्ट्रातील जनतेला राज्य सरकारच्या भूमिकेपासून दूर जाऊन काही घटनांचा बोध घ्यावाच लागणार आहे. कारण 'सारे जहाँ से अच्छा हिंदुस्था हमारा' असे आपण म्हणतो ते काही सहज म्हणून नव्हे. तर काही घटनांचा गांभीर्यपूर्ण अभ्यास जनतेने देखील केला पाहिजे साधा उदाहरण आपण मस्साजोग या गावचे घेऊ या.

अतिशय भावपूर्ण प्रसंग होता तेथील. सर्वांचे डोळे ओलावणारा. मस्साजोग गावातील मुस्लिम बांधवांनी ईद साजरी केली नाही. गोडधोड केले नाही आणि ते सर्वजण स्व. संतोष देशमुख ह्यांच्या कुटुंबाच्या दुःखात सामील झाले. ही भारताची, महाराष्ट्राची खरी सभ्यता, संस्कृती आणि ओळख याची शिकवण आहे. हाच आहे छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचा महाराष्ट्र. मुस्लिम समाजात स्वतःचा सख्खा भाऊ जरी वारला असल्यास तीन दिवसांनंतर सामान्य रीतिरिवाजाप्रमाणे त्या कुटुंबाने आपले जीवन पूर्ववत जगावे अशी प्रथा आहे.

मस्साजोगच्या मुस्लिम समाजाने ईद न साजरा करण्याचा निर्णय अनाकलनीय आहे, ऐतिहासिक आहे. सरपंच देशमुख यांच्या हत्येच्या दुःखात मस्साजोग येथील मुस्लिम बांधवांनी ना नवीन कपडे घेतले आणि ना आनंदात सण साजरा केला.

सर्व साधारण कष्टकरी हिंदू बांधवांना हे माहीत आहे की, मुस्लिम तुमच्या घराच्या शेजारचा आहे. सुखदुःखात सोबत असलेला, तुमच्या आमच्या सारखाच हसणारा, रडणारा. आपल्या सोबत सकाळपासून राबणारा, आपल्या सारखाच शेतकरी, लहान सहान व्यवसायी, आपल्या सारखाच जेमतेम शिकलेला, न शिकलेला. आपल्या एवढाच धर्म ज्ञान असलेला. मात्र कोणीतरी येतो आणि डोक्यात मुसलमान शत्रू आहेत म्हणून वात पेटवून जातो. दाखले असे देतो जे तुमच्या आमच्या स्वतःच्या बापजाद्यांनी कधीच सांगितलेले नव्हते.

मुसलमानांचे दुष्कृत्य असे सांगून जातो जे कधीही तुमच्या जीवनातील प्रसंग नसतात. मात्र लोक बळी जातात आणि ज्यांना तुमच्या आमच्या छाताडावर बसून राज्य करायचे आहे, त्यांचेच हस्तक होऊन, कधीही वैर नसलेल्या मुस्लिमांवर हल्ले करण्यात पुढे असतात. ते राजे बादशाह राजकीय मुसलमान वेगळे आणि तुमच्या सोबत जगणारे कष्टकरी मुसलमान तुमचे बांधव आहेत, एवढे समजून भाडकविणाऱ्या लोकांच्या पेकाटात लाथ मारली पाहिजे.

राज्यात ईद साजरी होत असताना मस्साजोगमध्ये मुस्लिम बांधवांनी ईद साजरी केली नाही. दरवर्षी प्रमाणे आपले लाडके सरपंच आपल्यात नसल्याने मस्साजोग गावातील मुस्लिम बांधवांनी रमजान ईद उत्सव साजरा न करण्याचा निर्णय घेतला होता. सोबतच मुस्लिम समाज बांधवां कडून देशमुख कुटूंबाला भेट देऊन सांत्वन करण्यात आले. याप्रसंगी वातावरण अत्यंत भावूक झाले होते.

येथेच खरा भारत पहायला मिळाला. तर दुसरीकडे पवित्र रमजान महिन्यात एका मुस्लिम व खिच्चन बांधवांनी असे पवित्र कार्य केले की, धर्म व जातीच्या नावाखाली राजकारण करणाऱ्यांना त्यांची मान शरमेने खाली घालायला लावली.

पुणे येथील सुधीर किंकळे या रास्ता पेठ येथील वयाची सत्तरी गाठलेल्या वृध्दाचे निधन झाले होते. धर्माने खिश्चन असलेल्या मायकल साठे यानी त्यांचे मित्र जावेद खान यांना कॉल केला की, त्यांच्या शेजारच्या बिल्डिंग मध्ये राहणारे एकजण मृत पावले आहेत आणि त्यांना फक्त त्यांची बहीणच आहे जयश्री किंकळे. त्यांना कोणीही नातेवाईक नाहीत त्यामुळे तु त्यांचा अंत्यविधी करतोस का?

संपूर्ण माहिती घेऊन ते ससून रुग्णालयातील डेड हाउस मध्ये पोहोचले. तिथे पंचनामा सुरु होता आणि संध्याकाळ होणार होती. चौकशी केली असता मृतदेह मिळण्यास रात्र होणार होती. अंत्यविधी करुन टाकु या, असे ते बोलताच मृताच्या भगीनीने म्हटले की, आम्ही ब्राह्मण आहोत आणि सूर्यास्त झाल्यावर आम्ही अंत्यविधी करीत नाही. रमजान महिना चालु, त्यात दुसऱ्या दिवशी सर्वात मोठी रमजान रात्र आणि नमाजाचा धार्मिक दिवस.

तरीही जात, धर्म बाजूला ठेऊन जावेदभाई सकाळी लवकर उठले व सगळीच कामे बाजूला ठेऊन मायकलला बरोबर घेऊन वैकुंठ येथे पोहोचले आणि त्या ब्राह्मण कुटूंबियांचे नातेवाईक झाले आणि अंत्यसंस्कार पार पाडले. खरा भारत याच ठिकाणी दिसतो.

महाराष्ट्रात सध्या नेतेमंडळी धार्मिक, जातीय मुद्दे उकरून काढत दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हा वाद सुरू आहे. हिंदू संघटनांकडून वांरवार एका समाजाला टार्गेट केलं जात असल्याचं दिसून येत आहे. हे सर्व राजकीय पातळीवर सुरू असलं तरी प्रत्यक्षात हिंदू-मुस्लीम एकतेने भारतात नांदत आहेत.याचीच परिणीती पुण्यातील या घटनेतून पाहायला मिळाली. जावेद खान मुस्लिम असूनही त्यांनी स्वतः हिंदू पद्धतीने अंत्यसंस्कार केला. सध्या राजकारण्यांकडून हिंदू-मुस्लीम असे धार्मिक वाद अगदी कबरीतून उकरून काढले जात आहेत. त्यात पुण्यातल्या जावेद खानने रमजानमध्ये उभारलेली ही समतेची गुढी खरंच कौतुकाची बाब आहे.

हिंदू व्यक्तींवर अंत्यसंस्कार करणारे पुण्यातील जावेद खान यांचं राज्यभरातून कौतुक केलं जात आहे. कोणी कितीही हिंदू-मुस्लीम केलं आणि इथली वीण उसवण्याचा प्रयत्न केला तरी ही माती इतकी कमजोर नाही की फुटीरतावादींच्या प्रयत्नांना खतपाणी घालेल. ■ ■ ■

## अनेक मान्यवर हिंदूना कुणी ठार मारले?

या देशात आहे हिंदू आणि मुस्लिमांमध्ये दुही निर्माण केली तर दीर्घकाळ सत्ता भोगता येईल एवढ्या एका कारणास्तव महाराष्ट्रातील दोन धर्मातील दरी वाढायला सुरुवात झाली आहे. परंतु नागरिक मात्र सावध झाले आहेत. त्यांनाही अंदाज आहे की, या मागची भूमिका काय असू शकते. पण बारकाईने विचार केला तर समजते की, समाजामध्ये संत महात्म्यांना मारण्याची भूमिका कोणी घेतली आहे? चक्रधर स्वामींना विष देणारे कोण होते? महात्मा बसवेश्वर यांना मारणारे, ज्ञानेश्वर आणि भावंडाचा छळ करणारे, संत रोहिदास, संत मीराबाईला मारणारे कोण होते? छत्रपती शिवाजी महाराजांना राजा म्हणून नाकारणारे कोण होते? छत्रपती संभाजी राजेंना पकडून देणारे कोण होते? राजर्षी शाहू महाराजांवर बॉम्ब स्फोट घडवून आणणारे कोण होते? महात्मा गांधींना ठार मारणारे कोण होते? नरेंद्र दाभोळकर यांचे मारेकरी कोण होते? गौरी लंकेश, गोविंद पानसरे यांना ठार मारणारे कोण होते? अशी अजून हजारो उदाहरणे शोधली तर निघतील. मात्र याचा एकच अर्थ निघतो, यादेशात ज्या ज्या महापुरुष, संत, महात्मा यांनी हिंदू समाजात समता, मानवता, बंधुता, न्याय ही मूल्य रुजवण्याचा प्रयत्न केला त्याला त्याला येथील विषमतावादी, धर्मांध संस्कृतीच्या ठेकेदारांनी ठार मारले. हा इथल्या देशाचा इतिहास आहे. इथल्या लोकांना भ्रमात, अज्ञानात, लाचारी आणि गुलामीत रहाण्यात सुख आणि आनंद वाटतो, हे इथले सत्य आहे!

## आता 'सौगात-ए- मोदी' नावाने उधळलेली रेवडी

भाजपने 'सौगात-ए- मोदी' नावाने उधळलेली रेवडी म्हणजे मुस्लिमांचे लांगुलचालन नाही बरं का! पण काँग्रेसने हज यात्रेसाठी दिलेले अनुदान मात्र मुस्लिमांचे लांगुलचालन असते. मोदींपासून फडणवीसांपर्यंत सगळ्या भाजपेई नेत्यांनी इफ्तार पार्ट्यांना हजेरी लावली तर त्याला धार्मिक सलोखा म्हणायचा आणि काँग्रेसपासून कम्युनिस्टापर्यंत विरोधी पक्षीयांनी इफ्तार पार्ट्यांना हजेरी लावली तर ते मात्र मुस्लिम लांगुलचालन होते बरं का! खरं म्हणजे भारताच्या इतिहासात एकही युद्ध दोन धर्मात झाल्याची कुठेही नोंद नाही. जी काही युध्ये झाली ती केवळ दोन राजांमध्ये झाली व तीही स्वतःचे साम्राज्य वाढवण्यासाठी झाली होती. म्हणूनच छ. शिवाजी महाराजांच्या सैन्यात जसे विविध अठरा पगड जातीतील लोक होते, तसेच मुस्लिम सैनिक आणि अधिकारी सुद्धा होते. छ.शिवाजी महाराजांचा वकील हा मुस्लिम होता तर अफजखानचा वकील एक ब्राम्हण होता. देशात बहुजन हिंदूंच्या मनात मुस्लिम राज्यकर्त्यांविषयी द्वेष निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक छ. संभाजी महाराज यांचा उल्लेख 'धर्मवीर' म्हणून करतात. एक असा संदेश द्यायचा आहे की छ. संभाजी महाराज हे स्वतःचा हिंदू धर्म वाचवण्यासाठी शहीद झाले होते आणि छ. शिवाजी महाराज आणि मोगलांतील युद्धे ही हिंदू विरुद्ध मुस्लिम अशी होती. पण वास्तव इतिहास वेगळाच आहे.

# मानवी कल्याणासाठी युध्द नाकारणारा सम्राट अशोक!



पूर्वार्ध

भारतीय इतिहासातील सर्वात महत्त्वाचा लोककल्याणकारी राजा ज्यांनी अखंड भारताचा नव्हे तर भारतासह बहुतांश भाग काबीज केला होता. भारतीय इतिहासात मौर्य साम्राज्याचे महत्व अनन्य साधारण आहे.

अशोक मौर्य हे भारतीय सम्राट आणि मौर्य घराण्यातील तिसरे शासक होते. मौर्य वंशातील सम्राट चंद्रगुप्तांपासुन ते सम्राट अशोकांपर्यंत प्रत्येक राजाने राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा सर्वत्र क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. या राजाच्या परंपरेतील सम्राट अशोकाची इतिहासातील भुमिका अनेकार्थाने महत्वाची ठरली आहे.

अशोक हा बिंदुसार या मौर्य सम्राटाचा पुत्र होता. अशोक हा बिंदुसाराच्या अनेक पुत्रांमध्ये शेवटून दुसरा होता. त्यामुळे अशोक मौर्य सम्राट बनेल अशी कोणाची अपेक्षा नव्हती. परंतु अशोकची सेनानी बनण्याची क्षमता वादातीत होती. त्यामुळे साहजिकच इतर भावांचा त्यावरील दुःस्वास वाढला होता.

चंद्रगुप्त मौर्याने जेव्हा जैन धर्म स्वीकारून राज्य सुखाचा त्याग केला, त्यावेळेस त्याने तलवार फेकून दिली. ही तलवार शोधून अशोकाने आपल्या जवळच ठेवली. अशोक लहानपणी तापट व खोडकर होता. तसेच चांगला शिकारीही होता. त्याला तत्कालीन राजपुत्रांना मिळणारे सर्व शिक्षण मिळाले होते. त्याच्यातील सेनानीचे गुण ओळखून बिंदुसाराने तरुणपणी त्याला अवंतीचा उठाव मोडण्यास पाठवले होते, हे काम त्याने सहज पार पाडले.

प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये एक महान चक्रवती सम्राट म्हणून अशोकाला मान्यता मिळालेली आहे. तत्कालीन अशोकाचे शिलालेख याची साक्ष नोंदविणारे महत्त्वपूर्ण साधने आहेत. असा विश्वविजेता सम्राट अशोक ज्याला चक्रवर्ती आणि अशोक द ग्रेट या नावांनीही ओळखले जाते.

सम्राट अशोकांना भारताच्या इतिहासात ही सर्वात महान व शक्तिशाली सम्राट म्हणून स्थान दिले आहे, ते जगातील सर्वात महान सम्राट होते. प्राचीन भारताच्या परंपरेत चक्रवर्ती सम्राटांची पदवी ज्यांनी जनमानसावर तसेच भारताच्या मोठ्या भूभागावर राज्य केले अशाच महान सम्राटांना दिली जाते.

सम्राट अशोकांना चक्रवर्ती सम्राट असे म्हणतात, चक्रवर्ती सम्राट म्हणजे सम्राटांचा सम्राट. आजचा पाकिस्तान, अफगाणिस्तान पूर्वेकडे बांग्लादेश ते दक्षिणेकडे केरळ पर्यंत तसेच नेपाळ, भूतान, इराण, ताजिकिस्तान आणि तुर्कमेनिस्तान या देशांमध्ये अशोकाच्या साम्राज्याच्या सीमा होत्या. अत्यंत शूर आपल्या आयुष्यात एक ही युद्ध हरले नाही असे चक्रवर्ती सम्राट अशोक जगाच्या पाठीवर कोणीही होऊ शकला नाही.

सम्राट अशोकाचा जेवढा साम्राज्य विस्तार होता, तेवढा हा पूर्ण भारत देश पण नाही आणि जेवढे वर्षे मोर्य शासकांनी या देशावर राज्य केले, तेवढे इतर कोणीही त्यांच्या आधीही नाही आणि नंतर ही करु शकले नाही.

सम्राट अशोक सत्य, अहिंसा, प्रेम, सहिष्णूता आणि शाकाहारी जीवनप्रणाली यांचे थोर पुरस्कर्ते होते म्हणूनच एक अतिशय परोपकारी प्रशासक अशीच इतिहासात त्यांची ओळख झाली आहे. अशोकाने आपल्या प्रजाजनांना व प्रशासकीय अधिकाऱ्यांना आपल्या शिलालेखातून काही राजाज्ञा दिलेल्या आहेत.

अशोकाचे शिलालेख हे मौर्य इतिहासाचे महत्त्वाचे साधन म्हणून ओळखले जाते. सर्वप्रथम ब्रिटिश अभ्यासक जेम्स प्रिन्सेप यांना अशोकाचे शिलालेख १८३७ मध्ये वाचता आले, ते अनेक भाषांचे अभ्यासक होते. अशोकाचे शिलालेख हे ब्राह्मी, खरोष्टी आणि अरेमाइक या तीन लिपींमध्ये आढळलेले आहेत. त्यातील अनेक अभिलेख हे ब्राह्मी लिपीतील असून ते जेम्स प्रिन्सेप यांनी वाचले, त्यातूनच या चक्रवर्ती सम्राटाच्या आयुष्याची आणि एकूणच मौर्य साम्राज्याविषयीची सखोल माहिती ही अभ्यासकांना मिळालेली आहे.

अशोकाने आपल्या शिलालेखामध्ये स्वतःला देवानाम प्रिय असे संबोधले आहे. कलिंग युद्धानंतर त्याचे झालेले मनपरिवर्तन, त्यांनी स्वीकार केलेला बौद्धधर्म, बौद्ध धर्माची तत्त्वे आणि एकूणच धर्मप्रसाराचे कार्य, महामात्र यांची नेमणूक या सर्व घटनांचा उल्लेख हा शिलालेखात आलेला आहे. सम्राट अशोक हे या काळातील अखंड भारताचे पहिले चक्रवर्ती राजा होय. सम्राट याचा अर्थ ज्याचा रथ घोडा चारही दिशांना कुणीही अडवू शकत नाही असा पराक्रमी शासक व विजेता होय.

कलिंगचे युद्ध ही इतिहासातील एक अतिशय वेगळी घटना समजली जाते. बौद्ध धर्माचा जगभर झालेल्या प्रसारास खूप मोठ्या प्रमाणावर अशोकाने केलेले कार्य जबाबदार होते असे इतिहासकार मानतात. अशोकाने पाटलीपुत्र येथे बौद्ध धर्माची तिसरी परिषद बोलावली होती, बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी अशोकाने आपला मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना श्रीलंकेत पाठवले.

अग्नेय अशिया आणि मध्य आशिया येथील देशांमध्ये त्याने धर्मप्रसारासाठी बौद्ध भिक्खू पाठवले होते त्याने अनेक स्तूप आणि विहार बांधले. त्याचप्रमाणे अशोकाने अनेक सोई निर्माण करण्यावर भर दिला. उदाहरणार्थ माणसांना तसेच पशूंना मोफत औषध उपचार मिळावे, याची त्यांनी सोय केली होती, अनेक नवे रस्ते बांधले, प्रवासामध्ये लोकांना सावली मिळावी यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झाडे लावली, नव्या धर्मशाळा बांधल्या, विहिरी खोदल्या, अशा प्रकारे त्याने अनेक लोकोपयोगी आणि कल्याणकारी कार्य केलं होतं. त्याचप्रमाणे बौद्ध धर्माचा मोठा प्रसार आणि प्रचार करण्याचे कामही अशोकाने केले.

धम्मचक्र परिवर्तन करणारा अशोक हा प्राचीन भारतातील एक श्रेष्ठ व चक्रवर्ती शासक ठरला आहे इतिहासाला युगानुयुगे त्याची नोंद घ्यावी लागेल. मानवी कल्याणासाठी अथक प्रयत्न करणारा प्रजा हीच दक्ष व प्रजा कल्याणकारी शासक म्हणून अनेक इतिहासकारांनी अशोकाच्या कार्याचा गौरव केलेला आहे.

हा बौध्द सम्राट म्हणून अशोकाचा असा विश्वास होता की, बौध्द धर्म हा सर्व मानव तसेच प्राणी व वनस्पतीसाठी फायदेशीर आहे म्हणून त्यांनी अनेक स्तूप, सांघाराम, विहार, चैत्य आणि दक्षिण आशियातील बौध्द भिक्कुंचे विहार, मठ बांधले. त्यांनी बुध्दांच्या अवशेषांवर ८४ हजार स्तुप बांधण्यास आज्ञा दिली आणि ते तयार झालेत, याला इतिहास साक्षीदार आहे.

ही काहीशी अतिशयोक्ति असली तरी भारतात बऱ्याच ठिकाणी सम्राट अशोकाच्या कालखंडात स्तुप उभारले गेलेत, हे ऐतिहासिक सत्य आहे. त्यांच्या कायार्चा पुरावा ९० च्या दशकात सन्नतीच्या बौध्द स्थळाचा शोध. जे स्थळ कर्नाटकातील कलबुर्गी जिल्हयात भीमा नदीच्या काठावर. या स्थळाच्या पुनरुज्जीवनाचे काम सध्या हाती घेण्यात आले आहे.

अशोकानंतर राज्याला योग्य उत्तराधिकारी न लाभल्यामुळे मौर्य साम्राज्याचा ऱ्हास घडून आला विशाल आणि एकछत्री केंद्रीकृत राज्य उभारण्याचा प्रयत्न अखिल भारतीय स्तरावर सर्वप्रथम मौर्य सम्राट यांनी केला यामध्ये चंद्रगुप्त आणि सम्राट अशोक यांची कार्य खूप महत्त्वपूर्ण राहिलेली आहे अशोकाने बौद्ध धर्माची शिकवण देताना लोककल्याणकारी राज्याच्या निर्मितीला चालना दिली शांततेच्या मार्गाने कुठलेही राज्य जास्त काळ टिकू शकेल यावर त्याचा विश्वास निर्माण झाला बौद्ध धर्माच्या प्रसाराला त्याने चालना दिली, त्यासाठी शासकीय अधिकारी नेमले स्वतःच्या मुलांना त्याने धर्म प्रसारासाठी पाठवले . धम्मचक्र परिवर्तन करणारा अशोक हा प्राचीन भारतातील एक श्रेष्ठ व चक्रवर्ती शासक ठरला आहे इतिहासाला युगानुयुगे त्याची नोंद घ्यावी लागेल मानवी कल्याणासाठी पथक प्रयत्न करणारा प्रजा हीच दक्ष व प्रजा कल्याणकारी शासक म्हणून अनेक इतिहासकारांनी अशोकाच्या कार्याचा गौरव केलेला आहे.

------------------

(लेखाचा उर्वरीत भाग उद्या) ■ ■ ■



प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

# बांगलादेशला धडा शिकवावा!

बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांना पदच्युत केल्यानंतर नोबेल पारितोषिक विजेते मोहंमद युनूस यांची बांगलादेशच्या अंतरिम सरकारच्या मुख्य सल्लागारपदी निवड करण्यात आली.

मोहंमद युनूस यांची बांगलादेश सरकारच्या मुख्य सल्लागारपदी निवड झाल्यावर भारताने त्याचे स्वागतच केले. त्यांच्या कारकिर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील असे भारताला वाटले होते पण त्यांनी भारताशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचे सोडाच उलट भारताशी पंगा घेण्याचेच त्यांनी ठरवले आहे.

मोहंमद युनुस हे पाकिस्तान आणि चीनच्या कच्छपी लागले असून भारताला पाण्यात पाहत आहे. त्यांच्या कारकिर्दीत भारत बांगलादेश संबंध सुधारण्याऐवजी बिघडतच चालले आहे. मोहंमद युनुस हे सत्तेवर आल्यापासून काही ना काही कारणाने भारताची कुरापत काढून भारताशी पंगा घेत आहेत. याआधी त्यांनी जमाते इस्लामी या कट्टरपंथीय संघटनेवर घातलेली बंदी उठवली. याच संघटनेने बंदी उठल्यानंतर बांग्लादेशात अल्पसंख्यांक असलेल्या हिंदू धर्मीय नागरिकांवर हल्ले केले.

भारताने हे हिंदूंवर होणारे हल्ले रोखावेत अशी विनंती त्यांच्याकडे केली पण त्यांनी त्याकडे सोईस्कर दुर्लक्ष केले त्यामुळे दोन्ही देशातील संबंध बिघडले हे संबंध पूर्ववत करण्या ऐवजी ते हे संबंध कसे बिघडतील हेच पाहत राहिले. भारताला डिवचण्यासाठी त्यांनी पाकिस्तान आणि चीनला जवळ केले.

काही दिवसापूर्वी पाकिस्तानच्या गुप्तहेर संघटनेचे म्हणजे आय एस आय चे चार अधिकारी बांगलादेश दौऱ्यावर गेले होते. या अधिकाऱ्यांचे बांग्लादेशात जंगी स्वागत करण्यात आले. या अधिकाऱ्यांनी मोहंमद युनूस यांच्याशी चर्चा केली . या चर्चेचा अजेंडा काय होता हे समोर आले नसले तरी यात काय चर्चा झाली असेल हे सांगायला तज्ज्ञांची गरज नाही.

या चर्चेनंतर मोहंमद युनूस यांनी पाकिस्तानचे तोंडभरून कौतुक केले. भारताने यावर थेट मतप्रदर्शन केले नसले तरी त्यांनी पाकला जवळ करून भारताला खिजवले हे मात्र नक्की. पाकला जवळ करत भारताशी पंगा घेऊन मोहंमद युनूस शांत बसले नाही आता तर त्यांनी थेट भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान दिले आहे.

मोहंमद युनूस हे चार दिवसीय चीनच्या दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्यात त्यांनी चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्यासोबत ९ करार केले. जे करताना त्यांनी चीनला खुश करण्याचा नादात थेट भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान दिले. या दौऱ्यात त्यांनी म्हंटले आहे की भारताच्या पूर्वोत्तर राज्यांना समुद्र लागून नाही. ही राज्ये पूर्णपणे जमिनीनी वेढलेली असल्याने चीनने या संधीचा फायदा घेऊन आपला प्रभाव वाढवावा.

हे वक्तव्य करून त्यांनी एकप्रकारे चीनला भारताच्या ईशान्येकडील राज्यावर आक्रमण करावे असे चिथावले आहे. इतके करून ते थांबले नाही तर ते पुढे म्हणतात भारताच्या ईशान्येकडील राज्यांना केवळ जमीन आहे त्यांना समुद्र नाही. समुद्र फक्त बांगलादेशला आहे. समुद्राचे स्वामित्व फक्त बांगलादेश कडेच आहे आणि बांगलादेश हाच समुद्राचा रक्षक आहे.

मोहंमद युनूस यांचे हे वक्तव्य अतिशय आक्षेपार्ह आणि निषेधार्ह आहे. त्यांचे हे वक्तव्य म्हणजे भारताला घेराव घालण्यासाठी चीनला आव्हान करणारे आहे. मोहंमद युनूस यांचे हे चिथावणीखोर वक्तव्य भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणारेच आहे. ईशान्य भारताच्या सुरक्षिततेसाठी बांगलादेश सरकारचा हा दृष्टिकोन अत्यंत धोकादायक आहे. भारताने मोहंमद युनूस यांच्या या वक्तव्याची कडक शब्दात निंदा करायला हवी. बांगलादेशसारखा देश ज्याच्या स्वातंत्र्याला भारताने मदत केली तोच देश आता भारताच्या विरोधात जात आहे.

इतकेच नाही तर थेट भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देत आहे, हे दुर्दैवी आहे . याला आळा बसायला हवा. त्यासाठी बांगलादेशला त्यांची जागा दाखवून द्यायला हवी. बांगलादेशने त्यांची ही नसती उठाठेव बंद केली नाही तर भारत त्यांना त्यांची जागा दाखवून देईल असा इशाराच भारताने द्यायला हवा. ■ ■ ■



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५



## मधुमेहाच्या रूग्णांनी आंबा खावा की नाही?

उन्हाळ्यात शरीराला निरोगी ठेवण्यासाठी आहारामध्ये पोषक तत्वांचा समावेश करू शकता. आता आंब्याचा हंगामही सुरू झाला आहे. आपल्यापैकी क्वचितच असा कोणी असेल ज्याला आंबा आवडत नाही. परंतु त्याच्या गोड चवीमुळे, मधुमेही रुग्ण आंबा खाऊ शकतात का असा प्रश्न उपस्थित होतो.

आंबा हा अनेक सूक्ष्म पोषक घटकांचा स्रोत आहे. त्यात काबोर्हायड्रेट्स, प्रथिने, अमीनो आम्ल, लिपिड्स आणि फायबर असतात. आंब्यामध्ये कोलेस्टेरॉल नसते. आंब्यातील सूक्ष्म पोषक घटकांमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस, लोह आणि जीवनसत्त्वे अ आणि क यांचा समावेश आहे. १०० ग्रॅम आंबा खाल्ल्याने ६०-९० कॅलरीज मिळतात.

आंब्यामध्ये फायबरचे प्रमाण जास्त आणि चरबीचे प्रमाण कमी असते. याशिवाय, ते सामान्य हृदयरोग तसेच कर्करोगासारख्या गंभीर आजारांपासून देखील संरक्षण करते. जर तुम्ही योग्य प्रमाणात आंबा खाल्ला तर त्यात असलेले फायबर पचन सुधारते.

परंतु मधुमेहाच्या रुग्णांनी आंबा कमी प्रमाणात खावा. आंब्याचा ग्लायसेमिक इंडेक्स ५१ आहे. त्यामुळे लोक मर्यादित प्रमाणात आंबा खाऊ शकतात. फळांचा गोडवा त्यांच्यामध्ये असलेल्या फ्रुक्टोजमुळे असतो आणि फ्रुक्टोज रक्तातील साखरेची पातळी वाढवत नाही.

आंब्यामध्ये अनेक पौष्टिक गुणधर्म आहेत. त्यात काबोर्हायड्रेट्स, प्रथिने, फायबर, कॅल्शियम, व्हिटॅमिन ए, के, बी ६, बी १२ आणि इतर अनेक पोषक घटक असतात. म्हणून, मधुमेही रुग्ण आंबे खाऊ शकतात, परंतु मर्यादित प्रमाणात . परंतु बटाटे, इतर धान्ये, तळलेले पदार्थ आणि उच्च कार्बयुक्त पदार्थांसह आंबे खाणे टाळावे. ज्यांना मधुमेह आहे त्यांनी काळजी घ्यावी. ■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### वारसा ..।

शिवरायांचे आम्हीस वारसदार
दावा करतो प्रत्येक पुढारी
पण त्यांच्या सारखी -
दिसते का हो कर्तबगारी ? ..

देशाचे सोडा, राज्याला तरी
देऊ शकता का स्थिर सरकार
कशाला उगाच
फुशारक्या मारता यार ..

जन्माने नव्हे कर्माने मिळतो
शिवरायांचा वारसा
हेच आम्ही विसरतो
म्हणून होतो हशा ..।


















## आज का अंदाज

शनिवार ५ एप्रिल २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ९ | ० | ३ | ४ | ७ | ८ |
| १२० | ७१० | ४७८ | २३५ | १३९ | ४०० | ३४० | ८०० |
| ३०० | ६०० | ३७९ | ४६० | ६७० | ७८९ | ५५७ | ३५० |
| ४९० | ५५६ | २७० | ३७० | ५८० | २४८ | ७०० | ५६७ |
| ३२ | ६२ | ९१ | ०१ | ३१ | ४१ | ७५ | ८५ |
| ३५ | ६५ | ९४ | ०४ | ३० | ४० | ७६ | ८६ |
| ३८ | ६८ | ९७ | ०७ | ३९ | ४९ | ७२ | ८२ |

**५ एप्रिल : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | ४९ | ५० | ८० |
| १७ | ४७ | ५३ | ८३ |
| १६ | ४६ | ५२ | ८२ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४




**महासागरच्या वाचकांसाठी...**

दैनिक 'महासागर'च्या नाशिक आवृत्तीमध्ये आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने आपले पूर्ण नाव, पदनाम फोटोसह पाठविल्यास त्यास विनामूल्य प्रसिद्धी दिली जाईल. – संपादक

## महत्त्वाचे

### थकबाकी वसुलीसाठी आवश्यक कायदेशीर कारवाई करावी : मुलानी

**दिंडोरी ।** कर्जदारांकडील थकबाकी वसुलीसाठी आवश्यक ती कायदेशीर कारवाई करावी, अशी सूचना जिल्हा उपनिंबधक फयाज मुलानी यांनी दिली. दिंडोरी येथे नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अधिकारी/ कर्मचारी/ सचिव, यांची आढावा बैठक नाशिक सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक फयाज मुलाणी यांच्या अध्यक्षतेखाली आज घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा बँकेच्या थकबाकीबाबत आढावा घेण्यात आला. थकबाकीबाबत ज्या संस्थाच्या अधिकारी, कर्मचारी सचिव यांनी कामकाज केलेले नाही किंवा चुकीचे कामकाज केलेले आहे. त्यांच्यावर सक्त कार्यवाही करण्यात येईल, अशा सूचना देण्यात आल्या. तसेच थकबाकी वसुलीसाठी आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात यांवी अशाही सुचना देण्यात आल्या. सदर सभेस सहकारी संस्थेचे जिल्हा विशेष लेखा परीक्षक ए. के. पाटील, दिंडोरी सहाय्यक निबंधक वैभव मोरडे, नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेचे प्रशासक पी बी चव्हाण, बँकेचे जिल्हा विभागीय अधिकारी ए. एम. पवार आदींसह अधिकारी उपस्थित होते.

### खंडणीसाठी महिला व पतीला मारहाण

**नाशिक ।** अंबड एमआयडीसी परिसरात खाजगी नोकरी करणाऱ्या एका महिलेवर व तिच्या पतीवर खंडणीसाठी अत्याचार, मारहाण आणि धमकी देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी अंबड पोलिस ठाण्यात नितीन पाटील, त्याचा साथीदार तुषार आणि त्यांच्यासोबत असलेल्या इतर चार ते पाच इसमांविरोधात भारतीय दंड संहिता आणि महाराष्ट्र सावकारी अधिनियमांतर्गत गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी गौरी सुबोध शहाणे (वय ५१, रा. धृवनगर, गंगापूर रोड, नाशिक) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २०१८ पासून आरोपी नितीन पाटील व त्याच्या साथीदारांनी व्याजाच्या नावाखाली बेकायदेशीर पद्धतीने वेळोवेळी पैसे मागितले. ३ एप्रिल २०२५ रोजी रात्री ११.२७ वाजता आरोपींनी त्यांच्या पतीकडून जबरदस्तीने २० लाख रुपये घेतले. यावेळी फिर्यादीला अश्लील शिवीगाळ करत, तिच्या अंगाला वाईट उद्देशाने हात लावत तिचे एक तोळ्याचे मंगळसूत्र हिसकावण्यात आले. तसेच कोयत्याची धमकी देऊन जीवे मारण्याची धमकीही दिली. पुढील दिवशी साडेतीन लाख रुपये रोख आणि आयसीआयसीआय व टीजेएसबी बँकेचे २८ चेक जबरदस्तीने लिहून घेण्यात आले. त्यानंतर फिर्यादीच्या पतीस गाडीवर जबरदस्तीने बसवून पाथर्डी फाट्यावर नेण्यात आले व तेथे मारहाण करून जखमी करण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मनोहर कारंडे व सहायक पोलीस निरीक्षक भंडे करत आहेत. आरोपींच्या अटकेसाठी पोलीस पथकांनी शोध मोहीम सुरु केली आहे.

### घरासमोरून मोटारसायकल चोरी; सिडकोत गुन्हा दाखल

**सिडको ।** सिडको परिसरातील रायगड चौक येथे घरासमोरून पार्क केलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरल्याची घटना समोर आली आहे. प्रसाद कारभारी वाघ (वय 42) यांनी अंबड पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, 29 मार्च 2025 रोजी दुपारी 1:30 वाजेपासून ते 30 मार्च सकाळी 9 वाजेच्या दरम्यान ही चोरी घडली. तक्रारदार यांच्या दाजी भरत शरद खैरनार यांच्या नावावर असलेली होंडा कंपनीची काळ्या रंगाची सी.डी. डिलक्स मोटारसायकल (क्रमांक MH15-BM-2729, मॉडेल 2005) घरासमोरील पार्किंगमध्ये उभी होती. मात्र, दुसऱ्या दिवशी ती चोरीस गेल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणी अंबड पोलिस ठाण्यात भारतीय दंड विधान संहिता कलम 303(2) अंतर्गत अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरी गेलेल्या मोटारसायकलची अंदाजित किंमत सुमारे 20,000 रुपये असल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे. पुढील तपास वपोनि राकेश हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा देशमुख करीत आहेत.

### आजचा वाढदिवस




**शैलेंद्र साळी**
वृत्तपत्र छायाचित्रकार, नाशिक

# गोदामाईसह नंदिनीही प्रदूषित तरीही समाधानतेची मल्लिनाथी

## प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे अध्यक्ष मनपाच्या कामाबाबत सकारात्मक








दक्षिण गंगोत्री गोदावरी नदीच्या प्रदूषणाचा चौफेर साज चढलेला असून, या नदीचे गोदाजल पिण्याच्याच काय पण स्नानाच्याही उपयोगितेचे राहिलेले नाही. नदी शुद्धीकरणाचे दायित्व स्वीकारलेल्या नाशिक म्हापालिकेकडून सुरु असलेल्या उपाययोजना, कार्यवाहीतून प्रदूषणाचा उंचावलेला पारा कुठेही खाली गेलेला दिसत नाही. असे असताना महाराष्ट्र प्रदूषण महामंडळाकडून नाशिक महापालिकेला गोदावरी-नंदिनी नदीच्या प्रदूषणासंदर्भात क्लीन चीट देण्याचा सुरु असलेला प्रयत्न पाहून नागरिकांना नक्कीच कपाळावर हात मारून घ्यावेसे वाटत असणार!

प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडून जल, वायू, ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी प्रयत्न करणे, त्यासाठी महापालिकेला विश्वासात घेऊन कार्यवाही करणे, त्यात दोषी ठरणाऱ्यांना शास्ती करणे अपेक्षित असताना प्रदूषणाला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांना केवळ नोटीस बजाविण्यापलीकडे काही ठोस केल्याचे निदर्शनास आलेले नाही. एकीकडे प्रदूषण महामंडळच गोदावरी नदीचे पाणी शुद्ध असल्याचा अहवाल देते अन दुसरीकडे गोदावरीचे पाणी की गटारींचे पाणी हेदेखील समजत नाही, अशी परिस्थिती आहे. असे असूनही महामंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम हे महामंडळाच्या कामकाजावर समाधान व्यक्त करतात. महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या लीला निदर्शनास आणून दिल्यावर तसे असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे सावरासावर करतात! हा प्रत्यय समस्त प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना गुरुवारी (दि.३) आला. महामंडळाचे अध्यक्ष आणि मनपा आयुक्तांनी घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी अध्यक्षांना प्रदूषणसंदर्भात अनेक प्रश्न करीत हा सूर्य आणि चंद्र यानुसार परिस्थिती विषद केली. यावेळी अध्यक्षांनी मात्र एकाच वेळेस महापालिकेला क्लीन चीट देण्याचा प्रयत्न करताना प्रदूषण महामंडळाचे काम समाधानकारक असल्याचा निर्वाळा देत सावरासावर कटण्याची पर्यत केला. त्यांचे बोलणे असंगत अन निव्वळ पोपटपंचीसारखे वाटत होते. या गडबडीत नदी प्रदूषणाचा मुद्दा मात्र पद्धतशीरपणे भरकटत होता.

सिंगल यूज प्लॅस्टिक मुद्द्यावर बोलतानाही त्यांनी काही ठोस न सांगता केवळ प्रबोधन प्रबोधनची कॅसेट वाजविली. सिंगल यूज प्लॅस्टिक उत्पादनाच्या मुळाशी जाऊन महापालिका आणि प्रदूषण मंडळाने कडक कारवाईचा आसूड ओढला तर सिंगल यूज प्लॅस्टिकचा प्रश्न बऱ्यापैकी मार्गी लागू शकेल! भाजी-फळे विक्रेते यासह तत्सम छोटे व्यावसायिक केवळ कारवाईचे बळी ठरतात. प्रश्न मात्र जैसे थेच राहतो. पत्रकार परिषदेपूर्वी मनपा आणि प्रदूषण मंडळाच्या झालेल्या संयुक्त बैठकीत महापालिकेने प्रदूषणसंदर्भात सुरू असलेल्या उपाययोजना, आवश्यक कामे-प्रकल्प, त्यासाठी आवश्यक निधी, प्रकल्प अहवाल याची माहिती प्रदूषण मंडळाच्या अध्यक्षांना दिली. अध्यक्ष कदम यांनी महापालिकेच्या कामाबाबत समाधानही व्यक्त केले. प्रदूषण संदर्भात जी जी मदत, सहकार्य लागेल ते उपलब्ध करून देण्याची तयारीही दाखवली यात शंका नाही; परंतु ते सर्व अति जलद गतीने व्हावे अन गोदावरी नदीसह नंदिनी नदी प्रदूषणमुक्त व्हावी हीच नागरिकांची अपेक्षा आहे! आगामी होऊ घातलेला सिंहस्थ कुंभमेळा तोंडावर आहे. उणेपुरे दीड वर्षे हातात आहे. त्या पार्श्वभूमीवर अति जलदगतीने कामे होणे अति गरजेचे आहे. कुंभमेळा आणि गोदाजल हे एक घट्ट असे समीकरण आहे. स्वच्छ गोदाजल हाच मुद्दा महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे प्रदूषणचा गोदावरीसह नंदिनीला लागलेला फास पूर्णपणे मोकळा करावा लागणार आहे. फक्त समाधान मानून, सावरासावर करून, एकमेकांना क्लीन चीट देऊन, कागदी घोडे नाचवून, अहवालबाजी करून भागणारे नाही, हे संबंधितांनी ध्यानात घेणे अति आवश्यक आहे.

## नाशिकरोड-देवळाली व्यापारी बँकेकडून ग्राहकांना दुचाकी वाहनकर्ज



**बेलगाव कुऱ्हे ।** सर्वसामान्य शेतकरी जनतेपर्यंत बँकेचे ध्येय धोरणे पोहचविणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट्ये आहे. ग्राहकांना पतपुरवठा करून सुविधा देणे तसेच बेरोजगारांना कर्ज पुरवठा, ठेवी वाढविणे बचतीची सवय लावणे, शेतकऱ्यांना कर्जयोजना देण्याचा आमचा मानस असल्याचे प्रतिपादन नाशिकरोड देवळाली व्यापारी बँकेचे जेष्ठ संचालक निवृत्ती अरिंगळे यांनी केले.

इगतपुरी तालुक्यातील साकुरफाटा भागातील ग्राहकांना वाहन कर्जाच्या माध्यमातून दुचाकी वाहनांचे जेष्ठ संचालक निवृत्ती अरिंगळे, बाबा सदाफुले, मनोहर कोरडे, श्रीराम गायकवाड, विलास पेखळे यांच्या हस्ते नुकतेच वितरण करण्यात आले याप्रसंगी ते बोलत. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हा उपाध्यक्ष उत्तमराव नाना सहाणे यांनी आनंद व्यक्त करीत बँकेच्या यशस्वी वाटचालिबाबत व शेतकरी हितासाठी काम करणाऱ्या बँकेच्या कार्यप्रणालीबद्दल कौतुक केले. याप्रसंगी बँकेचे सभासद भाऊसाहेब शिंदे, पै.रमेश कुकडे, घोटेकर, संतोष सहाणे, साकुर शाखेचे शाखाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## किर्लोस्कर इंजिनमार्फत गोसावी तंत्रनिकेतनच्या १४ विद्यार्थ्यांना रोजगार



**एकलहरे ।** नाशिकरोड येथील गोखले एज्युकेशन सोसायटीचा सर डॉ. मो. स. गोसावी तंत्रनिकेतनच्या १४ विद्यार्थ्यांची किर्लोस्कर ऑइल इंजिन लिमीटेड मार्फत निवड करण्यात आली असल्याची माहिती प्रकल्प संचालक प्रा. प्रदीप देशपांडे व प्राचार्या डॉ. श्रद्धा देशपांडे यांनी दिली.

यांत्रिकी अभियांत्रिकीच्या ११ तर विद्युत अभियांत्रिकीच्या ३ विद्यार्थ्यांची तसेच जे एम सी टी तंत्रनिकेतनच्या २ विद्यार्थ्यांची मुलाखतीद्वारे निवड करण्यात आली आहे, असे महाविद्यालयाचे प्रशिक्षण आणि प्लेसमेंट अधिकारी प्रा. जयंत महाजन यांनी सांगितले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मिलिंद राणे, विभागप्रमुख प्रा. मिलिंद बोबडे व इतर शिक्षकांचे सदर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले. किर्लोस्कर ऑइल इंजिन लि. चे पंकज सोनावणे, डिस्टील एज्युकेशन अँड टेकनॉलॉजी चे प्रदीप मोरे आणि निखिल लांडगे यांनी सदर विद्यार्थ्यांची मुलाखतीद्वारे निवड केली. विद्यार्थ्यांना मशीन, इलेक्ट्रिक मोटर, पॉवर जनरेशन, ऑरगॅनिक वेस्ट सोल्युशन अशा विविध विषयासंबंधी प्रश्न विचारण्यात आले. विद्यार्थ्यांनी अतिशय हजरजबाबीपणे उत्तरे देत सदर कंपनीत ट्रेनी इंजिनिअर या पदासाठी आपले स्थान निश्चित केले.

## ग्रामीण पोलीसांची अवैध व्यवसायांवर धडक मोहीम; साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त



**नाशिक ।** नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तसेच सराईत गुन्हेगारीस आळा घालण्यासाठी धडक मोहीम राबवली जात आहे.

त्याचाच एक भाग म्हणून या मोहिमेअंतर्गत दि. ३ एप्रिल रोजी परिविक्षाधीन भापोसे श्रीमती अपराजिता अग्निहोत्री यांच्या विशेष पथकाने सिन्नर शहरात, तर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नाशिक तालुका परिसरात छापे टाकून महत्त्वपूर्ण कारवाई केली. सिन्नर शहरातील लोंढे गल्ली परिसरात अवैधरित्या अंमली पदार्थांची विक्री होत असल्याची गोपनीय माहिती विशेष पथकाला मिळाली होती. त्यानुसार पथकातील अधिकारी व अंमलदारांनी सदर ठिकाणी छापा टाकून गांजा व भांग पावडर विक्री व सेवन करणाऱ्यांना ताब्यात घेतले. या कारवाईत ९.९४४ किलो वजनाचा गांजा आणि २२ किलो ६७० ग्रॅम वजनाची भांग पावडर असा एकूण ३,२६,१४० रुपयांचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. यासोबतच रोख १,९७,८१० रुपये असा एकूण ५,२३,९५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणी सिन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# सिडको प्रभाग ३१ मधील समस्यांवर भाजपचा हंडा मोर्चा

## शेकडो महिलांचा उत्स्फूर्त सहभाग



**सिडको ।** सिडको प्रभाग क्रमांक ३१ मध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून नागरिक विविध समस्यांनी त्रस्त आहेत. भीषण पाणीटंचाई, खराब रस्ते, अपूर्ण लाईट व्यवस्था आणि डिव्हायडरची कमतरता यामुळे नागरिकांचा संताप वाढत चालला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने बाळकृष्ण शिरसाठ यांच्या नेतृत्वाखाली सिडको विभागीय कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात महिलांचा विशेष सहभाग होता. त्यांनी डोक्यावर पाण्याचे हंडे घेऊन आणि हातात भाजपचे झेंडे घेऊन जोरदार घोषणाबाजी केली.

या मोर्चात पाथर्डी, सराफ नगर, जायभावे नगर, ज्ञानेश्वर नगर, मुरलीधर नगर आणि वासन नगर येथील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महिलांबरोबरच लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकही मोर्चात सामील झाले होते. "महापालिकेचे अधिकारी पेलवत नाही जबाबदारी", "जय भवानी, जय शिवाजी", "छत्रपती शिवाजी महाराज की जय" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. या आंदोलनासाठी मोठ्या खाजगी बसेसची व्यवस्था करण्यात आली होती, जेणेकरून नागरिक सहजपणे सिडको विभागीय कार्यालयात येऊ शकतील. ठिकठिकाणी बॅनर लावण्यात आले होते. मोर्चादरम्यान स्पीकरवरून सातत्याने घोषणा देण्यात येत होत्या. त्यामुळे काही काळ सिडको परिसरात वाहतुकीचा खोळंबा झाला होता. पोलीस प्रशासनाने योग्य त्या उपाययोजना करून बंदोबस्त ठेवला होता. या आंदोलनात बाळकृष्ण शिरसाठ यांच्यासह माजी नगरसेविका पुष्पा आव्हाड, भाजपचे भगवान दोंदे, अॅड. शाम बडोदे, साहेबराव आव्हाड आदी नेतेमंडळी उपस्थित होते. त्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले आणि समस्यांवर त्वरित तोडगा काढण्याची मागणी केली. महिलांनीही आपली व्यथा मांडताना प्रशासनाच्या उदासीनतेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. "आम्हाला दररोज पाण्यासाठी लांब जायला लागतं. लहान मुले, आजारी व्यक्ती, वृद्ध यांना यामुळे खूप त्रास होतो. रस्ते खराब आहेत, रात्री लाईट नसल्यामुळे महिलांना सुरक्षित वाटत नाही," असे एका रहिवाशिनीने सांगितले. हा मोर्चा शांततेत पार पडला असला तरी नागरिकांनी असा इशारा दिला की, जर वेळेत उपाययोजना झाल्या नाहीत, तर यापुढे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. नागरिकांच्या या सामूहिक कृतीमुळे प्रशासनाला आता तरी जाग येईल, अशी अपेक्षा आहे.

> प्रभाग क्रमांक ३१ मधील नागरी समस्या दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. पाणीटंचाईमुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यांची स्थिती दयनीय आहे आणि लाईट तसेच डिव्हायडरच्या अभावामुळे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही दखल घेतली जात नाही. म्हणूनच आम्ही मोर्चाच्या माध्यमातून आवाज उठवला आहे.
>
> – **बाळकृष्ण शिरसाठ, आंदोलन आयोजक**



# सेन्सेक्स 930 अंकांनी कोसळला
## गुंतवणूकदारांचे 10 लाख कोटी स्वाहा..

**मुंबई, दि.४ प्रतिनिधी**

भारतीय शेअर बाजार आज ४ एप्रिल रोजी सलग दुसऱ्या दिवशी घसरणीसह बंद झाले. सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही १ टक्क्यांहून अधिक घसरले. ट्रम्प यांच्या नवीन टॅरिफ घोषणांनंतर जागतिक स्तरावर व्यापार युद्धाची भीती वाढली आहे. यामुळे गुंतवणूकदार घाबरले आहेत. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक दोन्ही ३ टक्क्यांहून अधिक घसरले. यामुळे आज शेअर बाजारात गुंतवणूकदारांचे सुमारे १० लाख कोटी रुपये बुडाले.

सर्व क्षेत्रीय निर्देशांकही घसरून बंद झाले. आयटी, फार्मा, ऊर्जा, कमोडिटी, कॅपिटल गुड्स आणि रिअल्टी शेअर्समध्ये सर्वात मोठी



घसरण दिसून आली. व्यवहार बंद होताना सेन्सेक्स ९३०.६७ अंकांनी टक्क्यांनी कोसळून ७५,३६४.६९ वर बंद झाला. तर निफ्टी ३४०.७० अंकांनी घसरून २२,९०९.४० वर बंद झाला.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ४ एप्रिल रोजी ४०३.५५ लाख कोटी रुपयांवर

**सेन्सेक्स 75,364**

**निफ्टी 22,909**

घसरले. मागील व्यापार दिवशी म्हणजेच गुरुवार, ३ एप्रिल रोजी ते ४१३.३३ लाख कोटी रुपयांवरून होते. बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल ९.७८ लाख कोटी रुपयांनी कमी झाले आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ९.७८ लाख कोटी रुपयांची घट झाली आहे.

आज बीएसई सेन्सेक्समधील ३० पैकी २४ शेअर्स घसरणीसह बंद झाले. यामध्येही टाटा स्टीलचे शेअर्स सर्वाधिक ८.५९ टक्क्यांनी घसरले. दुसरीकडे, टाटा मोटर्स, लार्सन अँड टुब्रो, अदानी पोर्ट्स आणि इंडसइंड बँकेचे शेअर्स ३.८३ टक्क्यांनी घसरून ६.१५ टक्क्यांवर आले.

तर सेन्सेक्सचे उर्वरित ६ शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये बजाज फायनान्सच्या शेअर्समध्ये सर्वाधिक १.५९ टक्के वाढ झाली. यानंतर एचडीएफसी बँक, नेस्ले इंडिया, आयसीआयसीआय बँक आणि एशियन पेंटचे शेअर्स ०.२७ टक्क्यांपासून ते १.३० टक्क्यांपर्यंत वाढीसह बंद झाले.

# जबरदस्तीने वक्फ विधेयक मंजूर
## सोनिया गांधींचा आरोप, सत्ताधाऱ्यांचा गदारोळ

**नवी दिल्ली, दि. ४ वृत्तसंस्था**

काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी सभागृहावर जबरदस्तीने वक्फ विधेयक मंजूर केल्याचा आरोप केला. सोनिया गांधी यांनी सरकारविरुद्ध केलेल्या या वक्तव्याचा सभागृहात सत्ताधारी सदस्यांनी जोरदार निषेध केला. दरम्यान, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनीही त्यांच्या वक्तव्याचा निषेध केला आणि निष्पक्ष चर्चा झाली असल्याचे प्रतिपादन केले. यानंतर शुक्रवारी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी काही वेळातच लोकसभा अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आली.

सकाळी ११ वाजता कनिष्ठ सभागृहाचे अधिवेशन बोलावल्यानंतर काही वेळातच लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी कामकाज तहकूब केले. सोनिया गांधी यांच्या सरकारवर टीका करणाऱ्या वक्तव्यावर सत्ताधारी बाकावरील सदस्यांनी केलेल्या निषेधाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला. दुपारी १२ वाजता कामकाज पुन्हा सुरू झाले. दरम्यान, सत्ताधारी सदस्यांनी "सोनिया गांधी माफी मागो" अशी जोरदार घोषणाबाजी सुरू केली. यानंतर विरोधी पक्षनेतेदेखील आक्रमक झाल्यान लोकसभेत गोंधळ उडाला. त्यामुळे लोकसभा अध्यक्षांनी कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केले.

पश्चिम बंगालमध्ये २५,७०० हून अधिक शिक्षक आणि शिक्षकेतर



कर्मचाऱ्यांची भरती अवैध ठरवण्याच्या सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्याबद्दल घोषणाबाजी करण्यात आली. त्यामुळे सभागृहात गदारोळ निर्माण झाल्याने शुक्रवारी राज्यसभेचे कामकाज दुपारी १ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

सकाळच्या सत्रासाठी वरिष्ठ सभागृहाची बैठक झाली तेव्हा, राज्यसभा सभापती जगदीप धनखड यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा, निरोप संदेश आणि सूचीबद्ध पत्रके मांडली. यानंतर सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी पश्चिम बंगालच्या अवैध भरतीच्या विषयावर घोषणाबाजी सुरू केली. सत्ताधारी पक्षाने हा मुद्दा उपस्थित केला आणि तृणमूल काँग्रेसचे डेरेक ओ'ब्रायन यांनी प्रतिसाद देण्याचा प्रयत्न केला तेव्हा गोंधळ सुरू झाला आणि धनखड यांना दुपारी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दुपारी १ वाजेपर्यंत सभागृह तहकूब करावे लागले.

# विहिरीत पडलेल्या एकाला वाचवण्यासाठी लागोपाठ 7 जणांनी घेतल्या उड्या, सर्व ठार

**खंडवा, दि. ४ वृत्तसंस्था**

मध्य प्रदेशातील खंडवा जिल्ह्यातील एका विहिरीत पडलेल्या एका व्यक्तीला वाचवण्यासाठी गेलेल्या आठ जणांचा गुदमरून मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विहिरीत पडलेल्या एकाचा जीव वाचावा यासाठी एकापाठोपाठ एक असे हे सर्वजण विहिरीत उतरले होते. पण त्यांच्यापैकी कोणीच परत आले नाही. बचावकर्ते त्यांच्यापर्यंत पोहचण्याच्या आधीच हे सर्वजण चिखलात मृतावस्थेत पडलेले होते. दरम्यान या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली आहे. मध्यप्रदेशातील कोंडावत गावात गंगौर उत्सव साजरा केला जात होता. मात्र एकाच वेळी आठ जणांचा मृत्यू झाल्याने गावावर शोककळा पसरली आहे. मृत्युमुखी पडलेले आठही जण गंगौर विसर्जनासाठी विहीर स्वच्छ करत असताना ही घटना घडली आहे.

# इंदापूरच्या पश्चिम भागात सलग दोन दिवस अवकाळी; गहू आणि द्राक्षबागांना मोठा फटका

**इंदापूर, दि. ४ प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्याच्या पश्चिम भागामध्ये सलग दोन दिवस वादळी वारे व विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

इंदापूर तालुक्याच्या पश्चिम भागात सणसर, भवानीनगर, लाकडी, निंबोडी, काझड, कुरवली, बेलवाडी, सपकळवाडी, तावशी या भागामध्ये मंगळवारी तसेच बुधवारी अवकाळी पावसाने हजेरी लावली.

यामध्ये बुधवारी रात्री दहाच्या सुमारास जोरदार पाऊस झाला. सुमारे एक तास चाललेल्या या पावसामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, उसाच्या पिकांना पावसाचा चांगला फायदा झाला आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उसाच्या पिकाची किमान एक पाण्याची पाळी वाचण्यास मदत झाली आहे. ऐन उन्हाळ्यात या पावसाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे.

तालुक्याच्या पश्चिम भागातील शिंदेवाडी, काझड, बोरी या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात द्राक्षाच्या बागा असून, या भागात किमान चार ते साडेचार हजार एकर क्षेत्रामध्ये द्राक्षाची लागवड झाली आहे. यावर्षी आत्तापर्यंत किमान ६० टक्के द्राक्षाचा हंगाम संपला असून, ५०टक्के शेतकऱ्यांच्या शेतात अद्याप द्राक्ष आहेत. अवकाळी पावसामुळे या द्राक्षांच्या बागा व गहू पिकाचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे. गहू व द्राक्षाचा कापणीचा हंगाम अंतिम टप्प्यात आहे.

गहू व द्राक्षाच्या पिकाची मोठ्या प्रमाणात कापणी झालेली आहे. परंतु, अद्याप काही प्रमाणात गहू व द्राक्षकापणी होण्यापासून राहिली आहे. या पावसामुळे काढणीस आलेला गहू भिजला आहे. पावसाने गहू भिजल्यामुळे त्याचा दर्जा खालावण्याची शक्यता असल्याने भिजलेला गहू विक्रीसाठी नेल्यानंतर बाजारपेठेमध्ये शेतकऱ्यांना किमतीत फटका बसणार आहे. तसेच, द्राक्षाच्या घडामध्ये पावसाचे पाणी उतरल्याने घडामध्ये क्रॅकिंग होऊ लागले आहे.

### 'इफ्तारी चालते तर रामनवमी का नाही'?
# जादवपूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा ममता सरकारला सवाल

**कोलकाता, दि. ४ वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालमधील जादवपूर विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांनी ममता सरकारला कोंडीत पकडले आहे. विद्यापीठात इफ्तार पार्टी मोठ्या जल्लोषात साजरी होत असेल तर मग एक दिवस रामनवमी का साजरी होत नाही?, असा सवाल विद्यार्थ्यांनी पश्चिम बंगालच्या राज्य सरकारला केला आहे. यामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत.

कोलकाता येथील जादवपूर विद्यापीठामध्ये रामनवमी साजरी करण्याचा मानस हिंदू विद्यार्थी संघ आणि विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी केला आहे. पण, आता जादवपूर विद्यापीठाने कॅम्पसमध्ये रामनवमी उत्सव साजरा करण्यास परवानगी देण्यास नकार दिला आहे.

३ एप्रिल रोजी जादवपूर विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या कार्यालयात एक बैठक झाली. या बैठकीत उपस्थित असलेल्या सदस्यांनी २८ मार्च रोजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी दिलेला अर्ज फेटाळून लावला. विद्यार्थ्यांनी कॅम्पसमध्ये रामनवमी उत्सव साजरा करण्याची परवानगी मागितली होती. नकाराची दोन कारणे देण्यात आली. एक गोष्ट म्हणजे गेल्या वर्षी अशी परवानगी देण्यात आली नव्हती. दुसरे म्हणजे, सध्या कुलगुरू उपस्थित नसल्याने असा नवीन निर्णय घेता येत नाही, असं सांगण्यात आले होते.

बुधवारी विद्यार्थी आणि रामनवमी उत्सवाचे आयोजकांनी सांगितले की, यावर्षी कॅम्पसमध्ये रामनवमी साजरी करण्याचा त्यांचा निर्धार आहे. काही दिवसांपूर्वी कॅम्पसमध्ये इफ्तार पार्टीला परवानगी देण्याच्या विद्यापीठाच्या निर्णयावरही विद्यार्थ्यांनी प्रश्न उपस्थित केले.

रामनवमीचे आयोजक सोमसूर्या बॅनर्जी म्हणाले की, आम्ही या वर्षी विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये रामनवमी साजरी करणार आहे. आम्ही या वर्षी पाठीमागे हटणार नाही. जर लोक विद्यापीठात इफ्तार साजरी करु शकतात तर मग आम्ही रामनवमी साजरी का करु शकत नाही? आम्ही कायद्याने पुढे जाणार आहे आणि जो कोणी आम्ही थांबवण्याचा प्रयत्न करेल त्याच्याविरोधात कारवाई करणार, असंही ते म्हणाले.


# बंगळुरूमध्ये भाजपा पदाधिकाऱ्याची आत्महत्या; मृत्यूसाठी काँग्रेसला जबाबदार धरले

**बंगळुरू, दि. ४ वृत्तसंस्था**

बंगळुरूच्या नागवाडा येथील परिसरात शुक्रवारी एका ३५ वर्षीय व्यक्तीने आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठित सदर व्यक्तीने आत्महत्येसाठी जबाबदार असणाऱ्या लोकांची नावे लिहिली आहेत. आत्महत्या करणारे भाजपाचे पदाधिकारी विनय सोमय्या असल्याचे सांगितले जाते. स्थानिक काँग्रेस नेते तनिरा महेना, आमदार एएस पोन्नन्ना आणि इतर काही लोकांवर छळ केल्याचा आरोप केला आहे. खोट्या खटल्यात अडकविल्याच्या तणावातून आत्महत्या केल्याचे चिठ्ठीत नमूद केले आहे.

कर्नाटकच्या कोडागू जिल्ह्यातील सोमवारपेठ येथ राहणारे विनय सोमय्या हे "कोडागीना समस्येगालु" या व्हॉट्सअॅप ग्रुपचे अॅडमिन होते. या ग्रुपवर काँग्रेसचे आमदार आणि मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचे विधी सल्लागार एएस पोन्नन्ना यांच्याविरुद्ध एक वादग्रस्त पोस्ट शेअर करण्यात आली होती. या पोस्टमध्ये पोन्नन्ना यांचा पारंपरिक कोडवा वेषातला फोटो शौचालयाबाहेर लावल्याचे दाखविण्यात आले होते. तसेच फोटोसह काही आक्षेपार्ह मजकूरही लिहिला होता.

# ऐतिहासिक वास्तूंमध्ये पर्यटकांची ताजमहालला पसंती



**आग्रा, दि. ४ वृत्तसंस्था**

आग्रा येथील ऐतिहासिक महत्त्व असलेले मुघलकालीन वास्तू ताजमहाल पाहण्यासाठी जगभरातून पर्यटक येतात. हे प्रेक्षणीय इमारत पुन्हा एकदा चर्चेत आली आहे आणि त्याचे कारण म्हणजे ताजमहाल हे गेल्या पाच वर्षात तिकीट विक्रीतून सर्वाधिक कमाई करणारे एएसआय-संरक्षित ऐतिहासिक वास्तू ठरली आहे. सरकारने सादर केलेल्या आकडेवारीतून ही माहिती समोर आली आहे.

राज्यसभेत लिखित स्वरुपात विचारण्यात आलेल्या एका प्रश्नाला गुरूवारी उत्तर देताना केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र शिंह शेखावत यांनी याबद्दल माहिती दिली आहे.

आर्किलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडिया (एएसआय)ने गेल्या पाच वर्षात वेगवेगळ्या ऐतिहासिक वास्तु पाहाण्यासाठी आलेल्या पर्यटकांकडून तिकिटांच्या रुपात किती रक्कम गोळा केली, याबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. यामध्ये वार्षिक आणि एतिहासिक स्थळांनुसार वर्गवारी मागणी करण्यात आली होती. याबरोबरच गेल्या पाच वर्षात तिकिटांच्या विक्रीतून सर्वाधिक उत्पन्न मिळालेल्या एतिहासिक वास्तुबद्दलही विचारण्यात आले होते.

या प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय मंत्र्यांनी आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२३-२४ या आर्थिक वर्षांमधील सर्व माहिती जाहीर केली आहे. त्यांनी दिलेल्या आकडेवारीनुसार, ताजमहाल पाचही वर्ष या यादीमध्ये अव्वल स्थानावर राहिले आहे.

# वक्फ विधेयकाला पाठिंबा दिल्यामुळे नितीश कुमार, चंद्राबाबूंच्या पक्षांत अस्वस्थता

**नवी दिल्ली, दि. ४ वृत्तसंस्था**

गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत आलेल्या वक्फ विधेयकावर संसदच्या मंजुरीची मोहोर उमटली आहे. बुधवारी मध्यरात्रीनंतर लोकसभेत तर गुरुवारी मध्यरात्रीनंतर राज्यसभेत हे विधेयक मंजूर झालं. अपेक्षेप्रमाणे नितीश कुमार यांचा जदयू तर चंद्राबाबू नायडूंचा तेलुगु देसम पक्ष विधेयकाच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. मतदानही बाजूनेच केलं. पण आता त्यामुळे त्यांच्यासमोर पक्षांतर्गत आव्हानं निर्माण झाल्याचं चित्र समोर आलं आहे. त्यामुळे आगामी काळात या विधेयकाचे 'साईड इफेक्ट्स' भाजपाच्या या दोन्ही मित्रपक्षांना सहन करावे लागण्याची शक्यता आहे.

लोकसभेत विधेयक मंजूर झाल्यानंतरच या दोन्ही पक्षांमधील अस्वस्थता समोर येऊ लागली. या वर्षाच्या शेवटी विधानसभा निवडणुका होऊ घातलेल्या बिहारमध्ये सत्ताधारी जदयूमधील दोन प्रभावी मुस्लीम नेत्यांनी पक्षाच्या भूमिकेवर ताशेरे ओढले आहेत. शिवाय पक्षाचे चंपारण जिल्ह्यातील प्रमुख नेते मोहम्मद कासिम अन्सारी यांनी थेट पक्षाला सोडचिठ्ठी दिली.

एकीकडे जदयूमधील नेत्यांकडून आक्रमक भूमिका घेतली जात असताना दुसरीकडे चंद्राबाबूंच्या तेलुगु देसम पक्षातून सावधपणे अस्वस्थता व्यक्त होत आहे. पक्षाच्या काही नेत्यांनी विधेयकातील काही तरतुदींवर आक्षेप नोंदवला असला तरी चंद्राबाबू नायडूंनी आमच्या शंकांचं निरसन होईल, असा शब्द दिल्याचं या सदस्यांचं म्हणणं आहे.

टीडीपी व जेडीयू या दोन्ही पक्षांची आंध्र प्रदेश व बिहार या राज्यांमध्ये सत्ता आहे. या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मुस्लीम समुदाय आहे. त्यामुळे वक्फ विधेयकावरील या दोन्ही सत्ताधारी पक्षांच्या भूमिकेचे त्या त्या राज्यांत पडसाद उमटण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. तेलुगु देसम पक्षानं संसदेत विधेयकातील एका तरतुदीत सुधारणेची मागणी करताना विधेयकाला पाठिंबा दिला आहे. त्यात बिगर मुस्लीम व्यक्तींच्या वक्फमधील समावेशाचा मुद्दा होता. तर दुसरीकडे जदयूने कोणत्याही सुधारणेशिवाय विधेयकाला पूर्णपणे पाठिंबा दिला आहे. पण दोन्ही पक्षांनी चर्चेदरम्यान मुस्लीम समुदायासाठीची आपली बांधिलकी अधोरेखित केली.

दरम्यान, संसदेत जदयूनं पूर्ण पाठिंबा दिला असला तरी बाहेर मात्र विरोध दिसून आला आहे. जदयूचे सरचिटणीस आणि माजी राज्यसभा खासदार गुलाम रसूल बलयावी यांनी मुस्लीम संघटनांनी संयुक्त संसदीय समितीला सुचवलेल्या सुधारणा का दुर्लक्षित करण्यात आल्या? असा सवाल उपस्थित केला आहे.

"इथे धर्मनिरपेक्ष आणि सांप्रदायिक अशा दोन्ही शक्ती उघड्या पडल्याआहेत. एदारा-ए-शरीया संघटनेनं संसदीय समितीला शिफारसी केल्या होत्या. पण पक्षाध्यक्ष नितीश कुमार व तेलुगु देसमचे अध्यक्ष चंद्राबाबू नायडू या दोघांनीही विधेयक बनवताना मुस्लीम संघटनांच्या शिफारशींची दखल घेण्यात आली नसल्याचं सांगितलं आहे", असं बलयावी यांनी म्हटलं आहे. बलयावी हे बिहारमधील प्रभावी मुस्लीम नेते मानले जातात.

# अवकाळी पाऊस निसर्गचक्राचाच भाग

**नेमेचि येतो मग पावसाळा ... या उक्तीप्रमाणे आता अगदी डिसेंबर महिन्यापासून एन उन्हाळ्यात देखील महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाचा आणि गारपिटीचा अचानक मारा होतो.आणि या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचं उभं पीक उध्वस्त होत. सध्याही महाराष्ट्रातील नाशिक,मराठवाडा,लातूर सारख्या काही जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस कोसळतो आहे. याच पार्श्वभूमीवर अवकाळी पावसा संधर्भात मुंबई वेधशाळेचे हवामानतज्ज्ञ डॉ. सुनील कांबळे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

१] अवकाळी पाऊस असा अवेळी का कोसळतो?

अवकाळी म्हणजेच अकस्मात आलेला पाऊस. मोठ्या प्रमाणात बाष्पीभवनाची प्रक्रिया घडली कि वातावरणात उकाडा वाढतो आणि बिगर मोसमी वातावरणात देखील अवकाळी पाऊस आणि मोठ्या आकाराच्या गारांचा मारा होतो. हे निसर्गाचेच चक्र आहे. पूर्वी म्हणजे दोन दशकापूर्वी असा पाऊस एन उन्हाळी मोसमात पडायचा ज्याला आपण वळवाचा पाऊस म्हणायचो. परंतु आता जागतिक तापमान वाढ,अनेक प्रकारचे प्रदूषण आणि जंगलतोड यामुळे निसर्गाचे ऋतुचक्र बिघडतआहे त्याचाच हा दुष्परिणाम म्हणता येईल.

२]अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते त्यांना वेधशाळा अशा पावसाबाबत अलर्ट करतात का?

होय आता आपले हवामान खाते हे

**साप्ताहिक संवाद**

अतिशय अद्ययावत तंत्राने सुसज्ज आहे. आपल्याकडचे रडार हे वातावरणाचा आणि हवामानाचा सातत्याने वेध घेतात. आणि जर पुढील २४ तासाच्या अवधीत

**लोकरंग**

असा पाऊस कोसळण्याची चिन्ह असतील तर व्हाटस अप,मेसेज किंवा




ठराविक ऍप च्या मध्यमातून स्थानिक शेतकऱ्यांना अवकाळी पावसाची पूर्वसूचना देऊन अलर्ट केले जाते. शिवाय दृक्श्राव्य माध्यमातून देखील शेतकऱ्यांना सातत्याने हवामानाचा अंदाज सांगितला जातो.

३]अवकाळी पावसाची पूर्वसूचना ओळखुन शेतकऱ्यांनी काय काळजी घ्यायला हवी?

एकतर शेतकऱ्यांनी अशा पावसाची खबर बात कळण्यासाठी सातत्याने विविध समाजमाध्यमांशी संपर्कात राहावं. जर शेतातील पीक काढणीला आले असेल तर शक्य तेवढ्या पिकाची काढणी करून ते गोदामामध्ये साठवून ठेवाव. जर शेतात पीक उभं असेल तर पॉलिथिन चे शेड करून घ्यावं. हल्ली हरित गुहांमध्ये मोठ्या प्रमाणात शेतीचे प्रयोग केले जातात ज्यामुळे अशा अवकाळी पावसापासून पिकांचे नुकसान टाळता येते.

# मोटन समूहाद्वारे भारतात प्लास्टिक उद्योगाचा विस्तार



मोटन ग्रुप या प्लास्टिक्स प्रक्रिया उद्योगासाठी नाविन्यपूर्ण सोल्यूशन्समधील जागतिक अग्रगण्य कंपनीने अभिमानाने भारतातील चेन्नई येथे आपल्या अत्याधुनिक केंद्राच्या उद्घाटनाची घोषणा केली आहे. या धोरणात्मक विस्तारीकरणामधून भारतातील प्लास्टिक्स क्षेत्राच्या वाढत्या मागण्यांची पूर्तता करण्याप्रती मोटनची कटिबद्धता दिसून येते.नवीन उद्घाटन करण्यात आलेले केंद्र २ दशलक्ष युरोच्या (जवळपास १७ कोटी रूपये) लक्षणीय गुंतवूणकीला सादर करते, ज्यामधून भारतातील बाजारपेठेच्या क्षमतेमध्ये मोटनचा आत्मविश्वास दिसून येतो. तीन एकरहून अधिक जागेवर पसरलेले २०,००० चौरस फूट केंद्र संशोधन, विकास आणि वितरणासाठी मुख्य हब म्हणून सेवा देण्यास सज्ज आहे. या उपक्रमाचा भारतातील ग्राहकांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेली उच्च दर्जाची उत्पादने व सेवा वितरित करण्याच्या मोटनच्या क्षमतेला वाढवण्याचा मनसुबा आहे.

**दखल**

मोटन ग्रुपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती फुलसॅक सँड्रा यांनी कंपनीच्या जागतिक दृष्टिकोनावर भर दिला. त्या म्हणाल्या, ''१९४७ मध्ये लेक कॉन्स्टन्सच्या किनाऱ्यावर स्थापन झालेले मोटन प्लास्टिक उद्योगात प्रोसेस पेरिफेरल्ससाठी आघाडीची सहयोगी बनली आहे, जेथे कंपनीचे जगभरातील ८० हून अधिक देशांमध्ये प्रतिनिधीत्व आहे.'' मोटर इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या संचालक श्रीमती विद्या रमेशन उत्पादन ऑफरिंगजबाबत सांगताना म्हणाल्या: ''मोटन स्टोरेज, कन्व्हेइंग, ड्रायिंग, डोसिंग आणि मिक्सिंगपासून ते नियंत्रण आणि नियमन पर्यंत प्रक्रिया साखळीच्या प्रत्येक टप्प्यासाठी सानुकूलित घटकांची विस्तृत श्रेणी प्रदान करते. आमची उत्पादने साध्या, सर्वोत्तम घटकांपासून गुंतागूंतीच्या, केंद्रीय नियंत्रित सिस्टम्सपर्यंत विविध ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहेत.''

# तमिळनाडूतील रामेश्वरम मंदिर



तामिळनाडू, दक्षिण भारतात, निलगिरी टेकड्या आणि बंगालच्या उपसागराच्या मध्ये वसलेले आहे. लोकांना येण्यासाठी आणि भेट देण्यासाठी राज्य काही आश्चर्यकारक बीच शहरे आणि हिल स्टेशन ऑफर करते. हे राज्य हिंदू आणि ख्रिश्चनांसाठी एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. तमिळनाडूच्या एतिहासिक मूल्यामुळे ते भारतातील एक महत्त्वाचे ठिकाण आहे. तुम्हाला येथे 11 व्या शतकाच्या उत्तरार्धात असलेली विविध स्मारके आढळतील. तमिळनाडू हे भारतातील अनेक पर्यटन स्थळांसह भेट द्यायलाच हवे असे राज्य आहे. . रामेश्वरम हे भारतातील हिंदूंसाठी एक लोकप्रिय तीर्थक्षेत्र आहे. दरवर्षी या ठिकाणी हजारो भक्त येतात जे येथे येतात आणि रामनाथस्वामी मंदिरात पूजा करतात. चेन्नईहून शहरात जाण्यासाठी

**चला पर्यटनाला**

पर्यटक सहसा NH38 हायवेचा वापर करतात. रामेश्वरमला भारताच्या मुख्य भूमीशी जोडणारा पंबन पूल अत्यंत नयनरम्य आहे आणि 2.345 किमीवरून पाण्यावरून जातो. हे पूल गाड्या आणि वाहनांच्या प्रवासाच्या मार्गाला आधार देतात. या पुलावरून बंगालच्या उपसागराची काही विलोभनीय दृश्ये पाहायला मिळतात. रामेश्वरमला रामायणातही प्रासंगिकता आढळली आहे. तामिळनाडूतील इतर महत्त्वाची पर्यटन स्थळे म्हणजे श्री पंचमुखी हनुमान मंदिर आणि फ्लोटिंग स्टोन्स, रामर पथम, आणि कलाम हाऊस (एपीजे अब्दुल कलाम हाऊस/ संग्रहालय), श्री अरुल्मिगु रामनाथ स्वामी शिव मंदिर, संगुमल बीच इत्यादी आहेत.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# पत्नीच्या हत्येसाठी पती दीड वर्षे तुरुंगात
## पाच वर्षांनी प्रियकरासोबत नाश्ता करताना सापडली महिला

**बंगळुरू, दि. ४ वृत्तसंस्था**

कर्नाटकातील कोडागु जिल्ह्यात पाच वर्षांपूर्वी घडलेल्या कथित हत्येच्या प्रकरणात आता खळबळजनक खुलासा झाला आहे. पोलिसच्या म्हणण्यांनुसार, पाच वर्षांपूर्वी एका व्यक्तीने आपल्या पत्नीची हत्या केली होती. ज्यासाठी तो गेल्या दीड वर्षांपासून तुरुंगात होता. तुरुंगातील व्यक्तीची पत्नी तिच्या प्रियकरासोबत हॉटेलमध्ये सापडल्यानंतर या संपूर्ण प्रकरणाला वेगळे वळण लागले. हत्या झालेल्या महिलेला न्यायालयात हजर केल्यानंतर म्हैसूरच्या न्यायालयाने गुरुवारी पोलिस अधिकाऱ्यांवर चुकीच्या तपासाबद्दल ताशेरे ओढले.

याप्रकरणी म्हैसूरच्या पोलीस अधिक्षकाना पुन्हा चौकशी करण्याचे आणि १७ एप्रिल रोजी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. पोलिसांनी सादर केलेले पूर्वीचे आरोपपत्र या प्रकरणाशी संबंधित नसल्याचे, जिल्हा आणि सत्र न्यायाधीश गुरुराज सोमक्कलावार यांनी सांगितले. न्यायाधीशांनी यावेळी पोलीस अधिकाऱ्यांच्या गंभीर चुकांवरही प्रकाश टाकला. चुकीच्या तपासामुळे आरोपीला त्रास सहन करावा लागला आणि तो दीड वर्ष न्यायालयीन कोठडीत होता, असेही न्यायालाने म्हटले. कुरुबारा सुरेशा याची खून झालेली पत्नी मल्लिगे ही जिवंत असल्याच्या खुलाशाने सगळ्यांना धक्का बसला. सुरेशाने पत्नी मल्लिगे ही डिसेंबर २०२० मध्ये कोडागु जिल्ह्यातून बेपत्ता झाल्याची तक्रार केली होती. त्यानंतर पोलिसांनी सुरेशाला अटक करुन तुरुंगात पाठवलं होतं. नऊ महिन्यांनंतर, बेट्टाडापुरा पोलिसांना एका महिलेचा मृतदेह सापडला होता. पोलिसांनी सुरेशाला तो त्याच्या पत्नीचा मृतदेह म्हणून स्वीकारण्यास भाग पाडले आणि त्याला खून खटल्यात मुख्य आरोपी बनवले.

# प्रेशर पैशाचे नाही, संघाच्या यशाचे आहे- वेंकटेश अय्यर

**कोलकाता, दि. ४ वृत्तसंस्था**

कोलकाता नाईट रायडर्सने इंडियन प्रीमियर लीग 2025 च्या लिलावात वेंकटेश अय्यरला तब्बल 23.75 कोटी रुपयांना खरेदी केले. सुरुवातीच्या काही अपयशी डावांनंतर अखेर अय्यरने आपली प्रतिभा दाखवत सनराजर्स हैद्राबाद विरुद्ध 29 चेंडूत 60 धावांची तडाखेबंद खेळी केली आणि केकेआरसाठी मजबूत अशी 200 धावसंख्या उभारून दिली. यानंतर त्याच्यावर आयपीएलमधील महागड्या खेळाडूपैकी एक असल्यामुळे टीकेची झोड उठत होती. आता त्याने यावरचे मौन सोडत टीकाकारांना सडेतोड उत्तर दिले आहे. त्याने म्हटले आहे की, "पैशाचा खेळावर परिणाम होत नाही, तसेच पैसे तुम्ही कसे खेळणार ते ठरवत नाही." असे उत्तर दिले आहे.

प्रत्येक सामन्यात मोठी खेळी करण्याची अपेक्षा चुकीची असल्याचे अय्यरने स्पष्ट केले. पत्रकार परिषदेत




तो म्हणाला, "एकदा आयपीएल सुरू झाल्यानंतर तुम्ही 20 लाखांना विकले गेले असाल अथवा 20 कोटींना, त्याने तुमच्या खेळावर फरक पडत नाही. पैसे ठरवत नाहीत तुम्ही कसे खेळणार?."

अय्यरने आपल्या सहकाऱ्याचे कौतुक करत सांगितले, "आमच्याकडे अंगकृष रघुवंशीसारखा युवा खेळाडू आहे, जो उत्कृष्ट प्रदर्शन करत आहे. मी सर्वाधिक महागडा खेळाडू आहे याचा अर्थ असा नाही की प्रत्येक सामन्यात मीच चमकले पाहिजे. संघाच्या गरजेनुसार माझी भूमिका बदलते."

आयपीएलमध्ये मोठ्या किमतीचा दबाव असतो का, या प्रश्नावर तो म्हणाला, "हो, दबाव आहे, पण तो पैशाचा नाही. मला संघाच्या यशात योगदान द्यायचे आहे, हीच खरी जबाबदारी आहे."

वेंकटेश अय्यरने एसआरएच कर्णधार पॅट कमिन्सच्या एका षटकात 20 धावा काढत धुलाई केली. मात्र, कोणता गोलंदाज समोर आहे याकडे लक्ष न देता फक्त चेंडूवर लक्ष केंद्रित करतो, असे त्याने सांगितले. "आमच्याकडे रिंकू, रसेल, रामनदीपसारखे विस्फोटक खेळाडू आहेत. त्यामुळे आम्ही शेवटच्या षटकांत कोणत्याही संघाच्या गोलंदाजीचा धुव्वा उडवू शकतो," असे अय्यरने आत्मविश्वासाने सांगितले.

महासागर NASHIK
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com